शनिवार । १७ जून १९७८

७५ पैसे

# माणूस

५०० खेडी

१५० पाणीपुरवठा

योजना

ग्रामीण विद्युतीकरण

आरोग्य सेवा विस्तार

मुदत ?

एक वर्ष

**Outstanding**

**Work in**

**Himachal**

जे

हिमाचल प्रदेशात

घडू शकते

ते

महाराष्ट्रातील

निदान शंभर

'जनता' मतदारसंघातून

का घडू नये ?

योजकस्तत्र

दुर्लभ : !

**साप्ताहिक माणूस**

वर्ष अठरावे–अंक तिसरा

१७ जून १९७८

मूल्य ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४४३४५९
¤

# सप्रेम नमस्कार

¤ सर्वश्री पळशीकर, सहस्रबुद्धे व कामत यांची पत्रे १३ मे ७८ च्या अंकात वाचली. जरा आश्चर्य वाटले. पळशीकर एखाद्या गोष्टीबाबत साधी नाराजी व्यक्त करतात काय आणि सहस्रबुद्धे–कामत त्यांच्यावर तुटून पडतात काय ! सारेच अजब वाटते.

संपादन हे ज्यांचे काम त्यांनीच भाषेकडे लक्ष देऊ नका, विचारांचे बघा असे म्हणावे याचा अर्थ समजू शकत नाही. भाषा व विचार यांचा संबंध फळाची साल व आतील गर यासारखा आहे, या गैरसमजुतीतून कामत यांचा अभिनिवेश उद्भवला आहे. भाषेखेरीज विचाराला अस्तित्व नाही. ( क्वचित भावनेला भाषेशिवाय अस्तित्व असू शकेल. ) भाषेची प्रगल्भता, अचूकता व प्रवाहित्व यावरच विचारांचे प्रकटीकरण शंभर टक्के अवलंबून असते. तेव्हा शब्दांचाच व्यवहार प्रामुख्याने करणाऱ्यांनी तरी असली तर्कदुष्ट भूमिका घेता कामा नये.

१६।५।७८ **चंद्रशेखर मराठे**
अहमदाबाद.

¤ सुहास पळशीकर व शिरीष सहस्रबुद्धे यांची पत्रे वाचली ( माणूस १३–५–७८ ). त्यावरून सुचलेले काही विचार–

१ : मराठीतील शब्दभांडार अपुऱ्या पडणाऱ्या सहस्रबुद्धयांना जर इंग्रजी शब्द चालतात तर उच्चार माहीत नसताना एखादा शब्द त्यांनी रोमन लिपीत लिहावयास काहीच हरकत नाही. एकाच ' माणूस ' च्या अंकात Bertold Brecht ला ' ब्रेश्त ' व ' ब्रेख्ट ' केले आहे हे तरी निदान होऊ नये. देवनागरीमध्ये Brecht हे ' ब्रेश्ट ' असे लिहावे लागेल. जर्मनमध्ये ' त ' ही नाही व ' ट ' ही नाही. जर्मन ' t ' हा ' ट ' व ' ठ ' च्या मधला आहे– ' ट ' हा जास्त जवळचा. पण ' ब्रेश्त ' हे फारच झाले ! निदान जेथे गेली ६४ वर्षे जर्मन शिकविले जात आहे व दरवर्षी २००० विद्यार्थी जर्मन शिकत आहेत त्या पुण्यात हे होऊ नये !

२ : Alienation technique हे बहुतकरून ब्रेश्टच्या Verfremdunqs effekt ( V–Effekt ) चे भाषांतर असावे. त्याचे मराठीत तादात्म्याभाव अगर ऐक्याभाव तंत्र ( परिणाम ) असे भाषांतर करता यावे. नटाने पात्राशी एकरूप होऊ नये एवढीच ब्रेश्टची अपेक्षा होती. ते होऊ नये म्हणून ब्रेश्टने निरनिराळ्या तंत्रांचा वापर केला.

३ : जर्मन टीकाकारसुद्धा अलीकडे इंग्रजी शब्दांचा सर्रास वापर करतात. प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ अमेरिकन असल्यामुळे त्यांनी नवीन वापरलेले शब्द जसेच्या तसे उचलले जात असावे. आपण इंग्रजी शब्द का वापरले आहेत हे सहस्रबुद्धयांनी लिहिलेच आहे. त्यांच्याशी कोणाही सुबुद्ध व सुशिक्षित माणसाने सहमत होण्यास हरकत नाही. ओढून ताणून निर्माण केलेल्या मराठी शब्दापेक्षा सहज माहीत असलेला इंग्रजी शब्द अर्थातच जास्त सुगम (!) असतो. द्राक्षे विकणारी बाईसुद्धा सीडलेस द्राक्षे विकते. तिला काय ' बिन बियांचे ' असे म्हणता येत नाही ?

**श्री. भा. श्रोत्री**
धारवाड.

¤ २७ मेचा आझमगढ विशेषांक वाचला. आमच्या जिल्ह्यातील आमदार विनायकराव पाटील यांच्या ' महाराणी बाग कोठी नं. २ ' या १५–१६ मेला झालेल्या ए. आय. सी. सी. च्या अधिवेशनाचा सविस्तर वृत्तांत सांगणाऱ्या लेखात त्यांनी विलिनीकरणवाद्यांवर बरीच टीका केली आहे. महाराष्ट्रात संमिश्र मंत्रिमंडळ सत्तेवर आल्या दिवसापासून श्री. विनायकराव आणि त्यांचे सहकारी हे विलिनीकरणवाद्यांवर टीकाच करीत आहेत.

परंतु महाराष्ट्र काँग्रेसमधील विलिनीकरणवादी व विलिनीकरणविरोधी हे जोपर्यंत सत्तेच्या रेशमी दोरखंडाने आवळलेले आहेत व विलिनीकरणविरोधी हे सत्तेचा रेशमी दोरखंडाचा विळखा सोडविण्यात यशस्वी

होत नाहीत तोपर्यंत त्यांची टीका निरर्थक होय. कृपया त्यांनी व त्यांच्या सहकार्यांनी श्रीमती अरुणा असफअलींचा सल्ला मानावा हे त्यांना नम्रपणे सुचवू इच्छितो.

२५।५।७८ **मेघराज गोठी,** घोटी

◻ आपला वर्षारंभ अंक वाचला. वाचायला सुरुवात केल्यानंतर वाचणे पूर्ण झाल्यावरच खाली ठेवला. विजय परुळकरांचे संपन्न अनुभव वाचून आनंद झाला. परुळकरांचे मन:पूर्वक अभिनंदन. मी शेतकरी असल्याने त्यांनी लिहिलेला 'एक विकास योजना' हा लेख अंतःकरणाला जाऊन भिडला. आमच्या विकास योजनांची 'आग रामेश्वरी आणि बंब सोमेश्वरी' अशी अवस्था आहे खरी !

तसेच विचार करायला लावणारा दुसरा लेख 'बँकॉक ते कोसबाड.' परुळकरांच्या लेखातील इंग्लिशची मिसळ मलाही खटकली. त्यावर झालेली चर्चा वाचली; परंतु बाहेर देशात अनेक वर्षे राहिल्यावर मायभाषेतून विचार करायची सवयच बदलते हे मलाही अनेकांशी बोलताना जाणवले; परंतु ते प्रामाणिकपणेच आपले विचार मांडीत असतात.

मराठी माणसाने आपले विचार स्वच्छ मराठीत मांडावेत या रूढ मताचा मी असूनही परुळकरांनी लिहिलेले हे विविधदर्शी मूलगामी अनुभव वाचून भाषेचा भिरकोळ दोष माफ. असा उत्तम अंक काढल्याबद्दल आपलेही अभिनंदन.

६।६।७८ **जयवंत धायगुडे,**
भादे, पो. वाठार

◻ माणूसचा अठरावा वर्षारंभ–एकलेखकी विशेषांक वाचला. एकलेखकी विशेषांकाची कल्पना माणूसपुरती नाविन्यपूर्ण नसली तरी हा अंक वाचनीय. एकंदरीत जगाचं पाणी चाखलेला विजय परुळकर हा विलक्षण माणूस ग्रटच ! हा अंक सौदे अरेबियात नोकरीनिमित्त असलेल्या मुलाला पाठवून लिहिले आहे, 'माणूस : एक सर्व भक्षक प्राणी' हा लेख फक्त वाचावा. परुळकरांनी टेस्ट केलेले प्राणी खाण्याच्या भानगडीत पडू नये.'

विजय–सरोजा परुळकरांना कॉंग्रॅट्स.

२।६।७८ **चित्तरंजन घोटीकर,**
डोंबिवली

◻ एकलेखकी वर्षारंभ विशेषांक वाचला. फार दिवसांनी 'माणूस' वाचल्याचा आनंद मिळाला. लेखकही काय जबरदस्त मिळाला! प्रत्येक शब्दामागे कष्ट दिसतात, अनुभव दिसतो.

५।६।७८ **नि. म. आव्हाड,** नाशिक

◻ मी एका खेड्यात व्हिजिटला गेलो होतो. जिप नादुरुस्त झाली, पेशंटला सलाईन चालूच होते. त्यामुळे आपला वर्षारंभ अंक वाचण्यासाठी फुरसत मिळाली. मोठ्या मुष्किलीने कंदील मिळवून सर्व अंक वाचला. विजय परुळकर या व्यक्तीला भेटावे आणि मन:पूर्वक त्याचे अभिनंदन करावे असे वाटले. जगाचे सुरेख, उघडेनागडे, बीभत्स चित्रसुद्धा मानवतेच्या सहृदयतेने दाखविण्याची किमया त्यांना साधलेली आहे प्रत्येक लेख निराळा विचार, माहिती देतो, ज्ञानात भर घालतो.

५।६।७८ **डॉ. यशवंत बर्वे,** नांदगाव

◻ कोणत्याही पक्षाला बांधून न घेता, महाराष्ट्रीय सुबुद्ध वाचकांना विचारप्रवर्तक वाङ्मय पुरविणारी हाताच्या बोटावर मोजण्यासारखी जी थोडी वृत्तपत्रे आहेत त्यामध्ये 'माणूस'ला फार वरचे स्थान द्यावे लागेल. गेली अनेक वर्षे मी 'माणूस'चा ग्राहक वाचक आहे आणि आपले वैशिष्टचपूर्ण अंक हे आज वाचले आणि उद्या रद्दी झाले असे नसून वृत्तापेक्षा विचारप्रवर्तक असल्यामुळे ते संग्राह्य ठरतात.

या वर्षीचा अठराव्या वर्षाचा पहिला अंकसुद्धा तसाच वैशिष्टचपूर्ण आणि त्यामुळे संग्राह्य ठरला आहे. श्री. परुळकरांना कॅमेरा जितका वैशिष्टचपूर्ण हाताळता येतो तितकेच शब्दचित्रांनी प्रसंगही वास्तवरीत्या दृष्टीसमोर उभे करता येतात. एक व्यापक दृष्टी असलेला नवा लेखक आपण मराठी वाचकवर्गासमोर उभा केलात. नवे-नवे पण शिवं-सुंदरम् या व्याख्येत नसणारे लेखणी-बहाद्दर शोधण्याच्या आपल्या कौशल्याबद्दल हार्दिक अभिनंदन.

६।६।७८ **श्री. शां. आजगावकर**
मुंबई

◻ 'वर्षारंभ अंकातील संपादकीय वाचले. उत्कृष्ट आहे.

'कुठल्याही गटाला, व्यक्तीला किंवा पक्षाला मग ती व्यक्ती कितीही श्रेष्ठ असो-बांधून न घेतल्यामुळे...' असे तुम्ही म्हणता हे अर्धसत्य आहे. समाज प्रबोधनाच्या आपल्या विचारांच्या बांधिलकीव्यतिरिक्त मला ही बांधिलकी जाणवत राहिली. (अर्थात ती चांगलीच आहे.)

'मती कुंठित करून टाकील असा आमचा वर्तमानकाळ आहे' हे तर खरेच; पण भविष्य ? ते नाहीच असे वाटते. मी विचारच करायचे सोडले आहे. तरीही पुन्हा पुन्हा ये रे माझ्या मागल्या ... अंधारातून जाताना डोळ्यांपेक्षा पावलेच अधिक विश्वासू वाटतात. पावलेच बेइमान होतायत त्याला काय करणार ?

असो. आमच्या सदिच्छा सदैव आपल्या मागे आहेत. कर्मण्ये वाऽधिकारस्ते मा फलेषु कदाचन...

५।६।७८ **किशोर दीक्षित**
ठाणे

# दक्षता समिती आणि प्रकल्प समिती

श्री. ग. मा.

समाजवाद्यांचा खोडसाळपणा आणि जनसंघगटाचा अनुदारपणा यामुळे जनता पक्षाची पुण्याला ९।१० जूनला भरलेली राजकीय परिषद चांगलीच डागळली. पुस्तकविक्रीचा क्षुल्लक प्रश्न तो काय ! पण तोही समंजसपणे, सामोपचाराने मिटविता येऊ नये हे पक्षाच्या दृष्टीने फारच लाजिरवाणे आहे. मुळात जनता पक्षाच्या श्रेष्ठींनी कुठले पुस्तक विक्रीस ठेवावे किंवा ठेवू नये याबाबत ठराव करणेच अयोग्य होते. ज्यांना स्टॉल्स–दुकाने लावायची परवानगी दिली त्यांच्या सदभिरुचीवर व शहाणपणावर विसंबून राहणे उचित ठरले असते. एकदा याबाबत ठराव करून बसल्यावर त्याची काटेकोर अंमलबजावणी व्हावी असा आग्रह मग धरला जाऊ शकतो व डोकी तापल्यावर आग्रहाचे हट्टाग्रहात रूपांतर व्हायलाही वेळ लागत नाही. तसाच काहीसा प्रकार याबाबतीत घडला असावा असे वृत्तपत्रात आलेल्या बातम्यांवरून दिसते. ( अर्थात 'स्रोत' किंवा तत्सम पुस्तके विक्रीस न ठेवण्याची ठरावान्वये घातली गेलेली अपमानास्पद अट पुस्तकांच्या प्रकाशकांनी किंवा स्टॉल्सच्या चालकांनी स्वीकारलीच का, हा प्रश्न आहेच; आणि एकदा अशी अट स्वीकारली गेली असेल तर ती प्रामाणिकपणे न पाळणे साधनशुचितेत कितपत बसू शकते हा पुढचा प्रश्न ! आणि डॉ. बाबा आढाव किंवा रावसाहेब कसबे यांची पुस्तके विक्रीस ठेवली किंवा मंडलिकांचे एस्. एम्. जोशी यांना उद्देशून लिहिलेले अनावृत पत्रक परवानगी नसताही मंडपात किंवा मंडपाबाहेर वाटले गेले म्हणून बिघडावी, इतकी जनसंघगटाची तब्येत तोळामासा केव्हापासून झाली ? ) आता आरोपप्रत्यारोप काहीही चालू राहोत. पक्षश्रेष्ठींनी मुळात गाय मारायला नको होती. जो जे वांछील तो ते लिहो आणि वाचो असे वातावरण निर्माण करणाऱ्या जनता पक्षाने तर हा अव्यापारेषु व्यापार करण्याची काहीच गरज नव्हती; पण हे घडले आणि गायीबरोबर वासरूही कचाट्यात सापडले ! 'जनता पक्षाजवळ अनुभवी कार्यकर्त्यांचा तुटवडा आहे' असे नुकतेच मा. बाळासाहेब देवरस यांनी म्हटले आहे ते खरे वाटू लागते. हाच तुटवडा जयप्रकाशांजवळ होता व आहेही म्हणून संपूर्ण क्रांती थंडावली आणि दुसऱ्या टप्प्याचे त्यांनी आवाहन केल्यावर 'पहिला टप्पा कुठे आहे ?' असे कुत्सित प्रश्नही विचारले जाऊ लागले. जनता पक्षाने हा तुटवडा भरून काढण्यासाठी जारीने प्रयत्न केले नाहीत तर एक निवडणूकयंत्र म्हणूनसुद्धा पक्ष निकामी होईल. मग संपूर्ण क्रांती, वचनपूर्ती वगैरे तर फार लांबच्या बाता आहेत! वर्षभर लोकांनी या बाता ऐकून तरी घेतल्या. लवकरच लोक टवाळ्या करू लागतील. कंटाळून दुसरीकडे वळतील. हे घडायला नको असेल तर ठराव आणि भाषणबाजी यातून बाहेर पडून कृतीचा रोकडा प्रत्यय आणून द्यावा लागेल. निम्मा हिंदुस्थान ज्या पक्षाच्या ताब्यात आहे आणि महाराष्ट्रात जो सत्तास्थानाच्या अगदी जवळ उभा आहे त्या पक्षाच्या राजकीय परिषदेला असा प्रत्यय आणून देणे वास्तविक अवघड जायला नको; परंतु सर्वांनी उधारउसनवारीची भाषणे केली, लांबलचक ठराव संमत झाले आणि कोणताही विशेष ठसा न उमटविता, कार्यभाग न साधता परिषद आली तशी गेली. नसती झाली तरी चालू शकले असते. शोभा वाचली असती !

¤

वैयक्तिक पातळीवर जनता पक्षाजवळ कार्यकर्त्यांचे बळ तसे पाहता फार कमी नाही. पन्नालाल सुराणा, भागवत, वैद्य, लेले, नाईक वगैरे कार्यकर्ते; एस्. एम्. जोशी, म्हाळगी, मृणाल गोरे वगैरे नेते त्यागात, कर्तृत्वात उणे नाहीत; परंतु या सर्वांची तोंडे एकाच दिशेला आहेत असे दिसत नाही. या सर्वांच्या शक्ती पक्षबांधणीकडे वळायला हव्यात; परंतु दिसते असे, की आपापले पूर्वीचे गट मजबूत करण्यात या शक्ती खर्च होत आहेत. परस्परसंशयामुळे एकमेकांना शह देण्यात या शक्तीचा अपव्यय होत आहे. हे गट धोरणात्मक मतभेदामुळे टिकून आहेत असेही नाही. पुरोगामी–प्रतिगामी असाही हा तणाव नाही. गटांच्या जुन्या अस्मिता अद्याप कुणी सोडायला तयार नाहीत व त्यामुळे पक्षाची पायाभरणीच होत नाही, उत्क्रांतीला अडथळे येत आहेत. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर तीन गटांची ओढाताण सुरू आहे. जुने समाजवादी, जनसंघी आणि नव्याने आलेले फुटीर. फुटीरांना पूर्वीचा कुठलाच 'रंग' नसल्याने किंवा 'पाणी तेरा रंग कैसा, जिसमे मिलावो वैसा' अशी त्यांची स्थिती असल्याने इतर गटांचे रंग पुसून टाकण्याची त्यांना घाई झालेली आहे; पण प्रश्न रंग पुसण्याचा नाही. नवीन रंग चढविण्याचा आहे. हा रंग ध्येयवादाच्या व तत्त्वज्ञानाच्या मुशीत तयार झालेले नवीन

कार्यकर्तेच चढवू शकतील. तेव्हा अशा कार्यकर्त्यांची संख्या एकीकडे वाढली पाहिजे व जुन्या अनुभवी व तपस्वी कार्यकर्त्यांची–नेत्यांची या नवागतांशी नीट सांगड घातली गेली पाहिजे. अशी जोड जमली नाही तर वैयक्तिक पातळीवर पाच–दहा कार्यकर्ते–नेते कितीही प्रामाणिक व तत्त्वनिष्ठ असले तरी संधिसाधूंपुढे त्यांचा निभाव लागणार नाही व काँग्रेसच्या शंभुमेळ्यापेक्षाही हा जनता मेळा लवकर विघटित होईल. काँग्रेसची फाटाफूट झाली असूनही लोकांना असा सारखा भास होतो, की निर्णायक वेळ आली की हे बेटे एकत्र येतील, दुफळी सांधली जाईल आणि काँग्रेसपक्ष पुन्हा एक होईल. तीच गोष्ट कम्युनिस्ट पक्षाबद्दल. एका रात्रीतही दोन्ही कम्युनिस्ट प्रक्ष एक झाल्याचा चमत्कार घडू शकतो; पण 'फुटणार नाही, फुटणार नाही' अशी चंद्रशेखर–मोरारजी कितीही आश्वासने देत असले तरी जनता पक्ष फाटाफुटीच्या टोकाजवळ उभा आहे अशीच सर्वत्र भावना आहे. इंदिरा गांधी एकीकडे 'जनता पक्ष फुटणार नाही' असे म्हणतम्हणत दुसरीकडून जनतापक्षाच्या पायाखालची एकेक वीट सरकवीतच आहेत. ही स्थिती पालटायची असेल तर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर अधिक भर जिथे तिथे दिला जायला हवा. अंमलबजावणीत कार्यकर्ते गुंतले, की जुने वाद, प्रतिगामी–पुरोगामी वगैरे शुष्क काथ्याकूट करण्यास त्यांना वाव आणि उसंतच मिळणार नाही. कार्यकर्त्यांची नवीन भरती होत राहील; जुन्यांची टोके झिजत राहतील, कार्यानुभतीमुळे पक्षाची विश्वासार्हता वाढेल. ज्या राज्यात असा अंमलबजावणीचा धडाका सुरू झाला तेथील जनता राजवटीचे यश डोळ्यात भरण्यासारखे आहे. उदाहरणार्थ हिमाचलप्रदेश. 'टाइम्स'सारखी एरवी जनतापक्षाबद्दल फारशी उत्साही नसलेली वृत्तपत्रेही 'outstanding work in Himachal' असे मोठे मथळे देऊन हिमाचलप्रदेशातील एक वर्षाच्या जनता राजवटीची मुक्तकंठाने प्रशंसा करीत आहेत. हिमाचल प्रदेशात विधानसभेचे ६८ मतदारसंघ आहेत. प्रत्येक मतदारसंघात किमान एक तरी नवीन पाणीपुरवठा योजना मार्च ७८ अखेर पूर्ण करण्याची जबाबदारी त्या मतदारसंघातून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीवर टाकली गेली आणि ५०० खेड्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या १५० योजना असा नेट लावून पूर्ण करून घेण्यात आल्या. ग्रामीण विद्युतीकरण, ग्रामीण आरोग्ययोजना अशाच युद्धपातळीवरून राबविल्या गेल्या. गेल्या तीस वर्षांत जे घडले नाही ते जनता राजवटीने एक वर्षांत करून दाखविले असे प्रशस्तिपत्र टाइम्ससारख्या विरोधी गटाकडे झुकलेल्या वृत्तपत्राने द्यावे याला निश्चितच काही अर्थ आहे. नसेल महाराष्ट्रात सत्ता अद्याप जनता पक्षाच्या हाती आली. शंभर मतदारसंघ तर कुठे गेलेले नाहीत? एकेक मतदारसंघ किल्ला समजून बांधला गेला पाहिजे, त्यासाठी त्या भागातील एखादी विकासयोजना राबवून घेण्याचा आग्रह धरला जायला हवा. उत्तमराव पाटील धुळे जिल्ह्यातल्याच एखाद्या आदिवासी विकासयोजनेसाठी का उठाव करीत नाहीत? त्यांनी हा सगळा भाग हिंडून पाहिलेला आहे. एस्. एम्. जोशी व अन्य जनतानेत्यांनाही या भागातील परिस्थितीची पूर्ण कल्पना आहे. दहा दहा मैलांवरून पिण्याचे पाणी आणावे लागते, अशी गावे अद्याप तेथे किती तरी आहेत. रस्ते नाहीत. जमिनी मिळाल्या त्या पाण्याअभावी, खताअभावी, भांडवलाअभावी पिकवता येत नाहीत. ही स्थिती त्या भागात काम करणारे कार्यकर्ते ओरडून–आरडून गेली दहा वर्षे पुढारलेल्या समाजासमोर, शासनकर्त्यांसमोर मांडीत आहेत. सत्याग्रह झाले, महामोर्चे झाले; शंभरशंभर मैल उन्हातान्हातून पायी रखडत येऊन आदिवासींनी व त्यांच्यात मिळूनमिसळून राहणाऱ्या कार्यकर्त्यांनी धुळ्याला किंवा मुंबईला धडका मारल्या गेल्या वर्षी शहादे भागात धरण परिषद झाली. एस्. एम्. जोशी अध्यक्ष होते. लहान लहान धरणे–पाच–सात लाख रुपयांत पूर्ण होऊ शकणारी. ही झाली तर पाच–पन्नास गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटतो, जमिनीला पाणीपुरवठा होऊ शकतो. नकाशे, अंदाजपत्रके तयार होऊन धूळ खात पडलेली आहेत असे वर्षानुवर्षे शासनकर्त्यांकडून ऐकविले जात आहे. अशीच स्थिती अनेक जनता मतदारसंघांतून असणार. असे सरकारदफ्तरी धूळ खात पडलेले किंवा नव्याने सुरू करता येण्याजोगे लहानसहान प्रकल्प का नाही निवडणुकांच्या जिद्दीनेच उभे केले जाऊ? संपूर्ण क्रांतीच्या पाऊलखुणा अशा प्रकल्पातून उमटण्याची शक्यता अधिक आहे. दक्षता समित्यांचा कार्यक्रम मुळातच प्रतिक्रियात्मक आहे. दुसऱ्या कुणी चूक केली तर दक्षता समितीची गरज भासणार. यातून उपक्रमशीलता, विधायक नेतृत्व कसे जोपासले जाणार? दुसऱ्यांनी लिहिलेले पेपर्स तपासीत रहाणे हे काही तरुण मनांना प्रेरणा देणारे; वृत्तींना फुलविणारे काम ठरू शकत नाही. दक्षता समित्यांऐवजी प्रकल्प समित्यांचा आग्रह हवा. प्रत्येक मतदारसंघात निदान एकेक प्रकल्प तरी ठराविक मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांवर टाकली जावी. शासन आज हाती नाही म्हणून अडथळे येतील. ते दूर करीत राहणे, संधी मिळत राहील तेथे यश पदरात पाडून घेणे–या मार्गाने जनता पक्ष वाढविला गेला तरच तो काँग्रेसला किंवा इतर पूर्ण डाव्या पक्षांना पर्याय ठरू शकणार आहे. असा कार्यानुभव नसला तर भाषणबाजी आणि ठराव याशिवाय पक्षात दुसरे-तिसरे काही घडूच शकणार नाही. जुने गट-अहंकार सतत जागे होत राहतील आणि पुण्याच्या राजकीय परिषदेत जे घडले त्याची पुनरावृत्ती अटळ ठरेल. वेळ अद्याप गेलेली नाही; पण ती जाण्याची खूप शक्यता मात्र निर्माण झालेली आहे.

□

राजधानी दिल्ली

प्रतिनिधी

# पुन्हा एकदा झुंडशाहीशी मुकाबला करण्यासाठी –

एखाद्या बातमीचा सरकारकडून तातडीने इन्कार करण्यात आलेला आहे असे सहसा घडत नाही; परंतु परवा मात्र बरीच तत्परता दाखविण्यात आली. ही बातमी होती इंदिरा गांधींच्या संदर्भातील. शहा आयोगाने केंद्र सरकारला जे दोन हंगामी अहवाल सादर केले आहेत त्यांच्या आधारे इंदिरा गांधींवर खटला भरण्यासाठी खास न्यायालय स्थापन करण्याचे केंद्र सरकारने ठरविले असल्याचे त्या बातमीत म्हटले होते. हा खटला दीर्घकाळ रेंगाळत पडू नये म्हणून खास न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध एकदम थेट सर्वोच्च न्यायालयातच अपील दाखल करण्याची तरतूदही वटहुकूम काढून केली जाईल असेही सांगण्यात आले होते. ही बातमी प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियासारख्या नामांकित वृत्तसंस्थेने दिलेली असल्यामुळे वृत्तपत्रांनी तिला ठळक प्रसिद्धी दिली, परंतु ही बातमी ज्या दिवशी प्रसिद्ध झाली त्याच दिवशी केंद्र सरकारच्या प्रवक्त्याने तीत तथ्य नसल्याचे जाहीर केले.

केंद्र सरकारच्या या खुलाशामुळे सर्वांत अधिक निराशा कोणाची झाली असेल तर ती इंदिरा गांधींची.

कारण जनता सरकार लवकरच आपल्याला अटक करणार आहे असे त्या स्वतःच गेल्या कित्येक दिवसांपासून सांगत आलेल्या आहेत. आपल्याला अटक व्हावी, आपल्यावर खटला भरण्यात यावा यासाठी त्या अतिशय आसुसलेल्या आहेत. कारण तसे झाले तर आपल्या राजकीय पुनरागमनाला वेगाने चालना मिळेल हे त्यांना ठाऊक आहे. आपल्या अटकेचे राजकीय भांडवल करण्याच्या कार्यात त्यांच्या हिकमती तंत्राला बरेच यश येण्याचा संभव आहे, याचा इतर कोणाहीपेक्षा पंतप्रधान मोरारजी देसाई यांना चांगला अंदाज आहे. त्यामुळेच त्यांनी असे स्पष्टपणे सांगितले आहे की, इंदिरा गांधींवर खटला भरायला सरकार मुळीच कचरणार नाही याची खात्री पटल्यावरच सरकार पाऊल उचलील !

शहा आयोगाने आपल्या दोन अहवालांमध्ये इंदिरा गांधींवर जे आरोप ठेवले आहेत ते निश्चितच गंभीर आहेत. स्वतःचे पंतप्रधानपद सुरक्षित राखण्यासाठी आपल्या अधिकारपदाचा गैरवापर करून त्यांनी आणीबाणी लादली आणि साऱ्या देशाचे तुरुंगात रूपांतर केले हा त्यांचा सर्वांत मोठा अपराध आहे, परंतु हा गुन्हा भारतीय दंडसंहितेमध्ये बसू शकत नाही. आणीबाणीच्या अघोरी कालामध्ये अनेक सरकारी अधिकाऱ्यांना विनाकारण स्थानबद्ध व्हावे लागले. संजयच्या मारुती कारखान्याला सरकारी पैशाचा वारेमाप पुरवठा व्हावा म्हणून इंदिरा गांधींनी काही बँकांच्या अध्यक्षपदी आपली माणसे नेमली हे सारे खरे असले आणि अधिकाराचा हा गैरवापर सज्जड पुराव्यानिशी सिद्ध होऊ शकणारा असला तरी इंदिरा गांधींच्या मुख्य गुन्ह्याच्या मानाने त्यांचे हे अपराध गौण ठरतात.

सरकारची पंचाईत झाली आहे ती त्यामुळेच.

इंदिरा गांधींनी आणीबाणीमध्ये दडपशाही केली तिचे समग्र आणि साधार स्वरूप लोकांसमोर यावे यासाठी केंद्र सरकारने शहा आयोगाची स्थापना केली. जनता सरकारला इंदिरा गांधींच्या पद्धतीचाच कारभार करावयाचा असता तर त्याने अधिकारस्वीकार करताच इंदिरा गांधींना 'मिसा'खाली स्थानबद्ध करून ठेवले असते. त्या वेळची लोकभावना लक्षात घेता सरकारने तशी कारवाई केली असती तर तिच्यासंबंधी संतप्त प्रतिक्रियाही व्यक्त झाली नसती; परंतु न्यायोचित मार्गाने जाण्याचा जनता सरकारचा सुरुवातीपासून निर्धार असल्यामुळे त्याने चौकशी आयोग नेमला. इंदिरा गांधींचे गेल्या वर्षभरातील वर्तन पाहता सरकारने त्यांच्यासंबंधी जे उदार धोरण स्वीकारले ते चुकीचे होते अशा निष्कर्षाप्रत येणे भाग आहे; पण या 'जर-तर'च्या भाषेत आता काही अर्थ नाही.

आपण आणीबाणी लादली याचा इंदिरा गांधींना चुकूनही पश्चात्ताप झालेला नाही. निवडणुकीची वेळ आली की त्यासंबंधी त्या थोड्या नरमाईने बोलतात हे आंध्रप्रदेश आणि कर्नाटक येथल्या त्यांच्या वक्तव्यांवरून दिसून आले आहे; परंतु तेथील निवडणुकीत घवघवीत यश मिळाल्यानंतर पुन्हा त्यांची नेहमीची उद्धट आणि कांगावखोर भाषा सुरू होते. आपला आणि आपल्या लाडक्या संजयचा जनता सरकार मानसिक छळ करीत आहे अशी धादांत खोटी मुलाखत परदेशी वार्ताहरांना देताना त्यांना मुळीच संकोच वाटत नाही. वस्तुतः 'मला न्याय द्या' अशी मागणी करण्याचा इंदिरा गांधींना कोणताही नैतिक अधिकार उरलेला नाही. जे त्यांनी इतरांना बेदिक्कतपणे नाकारले होते ते आपल्याला मिळावे असा आग्रह त्या कशाच्या आधारावर धरू शकतात ? तरीही त्यांची जनता सरकारवर आदळआपट चालूच आहे; कारण आपला मुख्य गुन्हा कायद्याच्या चौकटीत बसू शकत नाही हे त्या ओळखून आहेत.

शहा आयोगाची नियुक्ती केल्यानंतर आणि त्या आयोगाचे अहवाल सादर झाल्यानंतर सरकारला स्वस्थ बसून चालणार नाही. परंतु त्याचबरोबर हे आरोप कशा रीतीने शाबीत करायचे हे त्याला उमगत नाही, असा हा पेच आहे.

इंदिरा गांधींवरील घटनेची मोडतोड करण्याचा आणि त्या मोडतोडीनुसार सुलतानी कारभार केल्याचा मुख्य आरोप जर दंडसंहितेच्या कक्षेत बसत नसेल तर इतर मामुली गुन्ह्यांबद्दल त्यांच्यावर खटला दाखल करण्यात फारसे स्वारस्य नाही. कारण एक तर त्यासाठी

खास न्यायालयाची स्थापना करण्याची गरज उरत नाही. त्याबाबतीत नेहमीचाच कायदेशीर मार्ग अवलंबिणे भाग आहे म्हणजे प्रथम दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात आरोपपत्र दाखल करणे आणि त्यानंतर जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय आणि शेवटी सर्वोच्च न्यायालय अशा मार्गाने जाणे हाच पर्याय शिल्लक उरतो. हा पर्याय स्वीकारला तर शहा आयोगापुढे जे साक्षीपुरावे झाले त्यांचीच पुनरुक्ती होईल. शिवाय हे काम किती वर्षे चालू राहील याचीही शाश्वती नाही. त्यामुळे शहा आयोगासारख्या निःपक्ष सत्यशोधन समितीने इंदिरा गांधी यांच्या अरेरावी वर्तनासंबंधी आणि मुजोर उपायांसंबंधी जे मत व्यक्त केले आहे तेवढ्याने त्यांचे खरे स्वरूप लोकांपुढे आलेले आहे, असे समजून पुढच्या न्यायालयीन कारवाईचा विचार सोडून द्यावा असे काही जणांना वाटते. कोणाला असे करण्याने माघार घेतल्यासारखे वाटेलही; परंतु इंदिरा गांधींना अकारण सस्ते हौतात्म्य देण्यापेक्षा, वरकरणी नरमाईचा दिसणारा हा पवित्राच योग्य ठरेल.

■

अर्थात केंद्र-सरकारने तसे निश्चितपणे ठरविले आहे, असे मुळीच नव्हे. कारण इंदिरा गांधींप्रमाणे संजय गांधी, विद्याचरण शुक्ला आणि बन्सीलाल यांच्या तानाशाहीची चौकशी करण्यासाठी सरकारने आणखी दोन आयोग नेमले असून त्यांचे काम पुरे होत आले आहे. त्या तिघांवर फौजदारी खटला भरण्याइतका पुरावा त्या आयोगांपुढे झालेल्या जबान्यांतून उपलब्ध होणार आहे. साहजिकच संजय, विद्याचरण आणि बन्सीलाल यांना न्यायालयात खेचणे सरकारला सहज शक्य होणार आहे; परंतु प्रमुख गुन्हेगाराला तसेच मोकळे ठेवून त्याच्या चिथावणीवरून मोकाट सुटलेल्या त्याच्या हस्तकांनाच केवळ तुरुंगात डांबण्याने असा कितीसा कार्यभाग साधणार आहे ?

इंदिरा गांधींना शिक्षा झालीच पाहिजे असे जे लोक आग्रहाने म्हणतात, त्यांच्या मनात इंदिरा गांधींसंबंधी सूडबुद्धी आहे असा बिनबुडाचा आरोप इंदिरा काँग्रेसच्या कार्यकारिणीने खुशाल करावा; परंतु ज्यांचा विवेक ठिकाणावर आहे त्यांना हे ठाऊक आहे की, स्वतःच्या सोयीसाठी आणीबाणी पुकारण्याची हिंमत यापुढे कोणालाही होऊ नये म्हणून इंदिरा गांधींवरील आरोपांची न्यायासनापुढे शहानिशा होण्याची गरज आहे. मात्र हे काम जर रेंगाळणार असेल तर त्यातील वाफ निघून जाईल आणि मधला काळ इंदिरा गांधींना आकांडतांडव करायला उपयोगी पडेल हे ध्यानात धरूनच नेमके काय करावयाचे हे केंद्र-सरकारला ठरवावे लागणार आहे. मुख्य म्हणजे गेल्या ४ ऑक्टोबर रोजी जो बोजवारा उडाला तसे या वेळी होऊ नये यासाठी सर्व ती काळजी घेतल्यानंतरच सरकारी कारवाईला प्रारंभ होईल. अद्याप त्या बाबतीत काहीच ठरलेले नसताना, इंदिरा काँग्रेस मात्र हा न्यायालयीन प्रश्न रस्त्यावर सोडविण्याच्या दृष्टीने तक्रारी करू लागलेली आहे. निदर्शनांच्या नावाखाली दंगली घडवून आणण्याच्या कार्यात संजय आता पुरा तरबेज झालेला आहे. भाडोत्री गुंडांकरवी धुमाकूळ घालून, दहशत निर्माण करण्याचे दिल्लीमध्ये गेल्या आठ–नऊ वर्षांमध्ये अवलंबलेले तंत्र साऱ्या देशभर वापरता यावे म्हणून इंदिरा काँग्रेसने सध्या 'निदर्शक नोंदणी' आरंभिलेली आहे. या निदर्शकांचा खर्च भागविण्याइतका पैसा इंदिरा काँग्रेसपाशी आहे. आणीबाणीत पक्षनिधीच्या नावाखाली जमा केलेली पुंजी अशा कित्येक निदर्शकांना पुरी पडू शकेल.

अशा हिंसक निदर्शनांचा बंदोबस्त करणे सरकारला मुळीच अवघड जाणार नाही; परंतु तेवढ्यावरून इंदिरा गांधींच्या पुनरागमनाचे आव्हान जनता सरकारला पेलता येणे कठीण आहे. जोपर्यंत जनता पक्षाला आपली एकसंध प्रतिमा तयार करता येत नाही तोपर्यंत त्याने उचललेले कोणतेही पाऊल निसरडेच राहणार आहे. कारण इंदिरा गांधींचे आव्हान मुख्यतः राजकीय स्वरूपाचे असून ते त्या रणांगणात स्वीकारावे लागणार आहे. सार्वत्रिक निवडणुकीला अजून बराच अवधी असला तरी पोटनिवडणुका अधूनमधून होतच राहणार आहेत. आझमगढमधला जनता पक्षाचा पराभव इंदिरा काँग्रेसच्या सामर्थ्यापेक्षा जनता पक्षातील दुहीचा परिपाक होता. तेथील जाणकार लोक असे सांगतात की, जनता पक्षाचे रामबचन यादव यांचा सत्तर–पंचाहत्तर हजार मतांनी पराभव होईल असा अगोदरचा अंदाज होता. शेवटच्या काही दिवसांमध्ये इंदिरा गांधी तेथे मुक्कामासाठी आल्यानंतर ही मते चाळीस हजारांनी खाली आली. त्यामुळे मते जिंकण्याची इंदिरा गांधींपाशी जादू आहे, असल्या भाकड कल्पनेवर विश्वास ठेवून हतबल होण्याऐवजी, जनता पक्षाचे वरिष्ठ नेते आपल्या एकजुटीचा प्रत्यय घडवितील तर इंदिरा गांधींना निवडणुकीच्या मैदानातही पुन्हा एकदा पराभूत करणे त्यांना मुळीच अशक्य ठरणार नाही.

भिन्न विचारसरणीचे चार पक्ष एकत्र आल्यानंतर कुरबुरी होत राहणारच हे समर्थन समजण्यासारखे असले तरी पटण्यासारखे नाही. आपल्या मतभिन्नतेचा विचार जनता पक्षात विलीन होण्यापूर्वी घटक पक्षांनी करावयास हवा होता. त्या वेळी जर परिस्थितीच्या रेट्यापायी त्यांना आपल्या वैचारिक मतभेदांकडे पाठ फिरवावी लागली तर अजूनही परिस्थिती पूर्णपणे निवळलेली नाही हे ध्यानात घेऊन त्यांनी आपल्या जुन्या आग्रहांचा वारंवार उच्चार करण्याचे टाळले पाहिजे. सुदैवाने जनता सरकारचा कारभार काँग्रेसी राजवटीच्या तुलनेने किती तरी स्वच्छ आहे. वाजपेयी, दंडवते, फर्नांडिस, अडवानी, रवींद्र वर्मा प्रभृती मंत्र्यांनी आपापल्या खात्यावर चांगली पकड मिळविली आहे. सुजाण लोकमताची सदिच्छा या सरकारच्या पाठीशी आहे. हे बळ फार मोठे आहे. ते ओसरणार नाही याची काळजी जनता पक्षाची सूत्रे सांभाळणाऱ्यांनी घेतली तर १९७७ च्या मार्चमध्ये त्यांना जो अद्भुत पराक्रम करून दाखवता आला तसा तो इंदिरा गांधींच्या रूपाने उभ्या ठाकलेल्या मगरूर झुंडशाहीचा बीमोड करतानाही दाखवता येऊ शकेल. लोकशाहीच्या उपासकांना लोकशाहीच्या रक्षणासाठी काही पथ्ये पाळावीच लागतात हे जनतानेत्यांनी विसरून चालणार नाही. पक्षसंघटनेच्या आगामी निवडणुकीकडे त्यांना त्या दृष्टिकोनातूनच पहावे लागणार आहे.

□

# जनता पक्ष परिषद

## नवी दिशा काही मिळाली का ?

वा. दा. रानडे

महाराष्ट्र जनता पक्षाची राजकीय परिषद ९ जूनला पुण्यात झाली. त्यातील ठराव, भाषणे, पुस्तकविक्रीच्या प्रश्नावरून झालेली मारामारी यासंबंधी सविस्तर वृत्तांत दैनिक वृत्तपत्रात येऊन गेलेलेच आहेत. त्यांची पुनरुक्ती न करता या परिषदेने काय साधले? जनता पक्षापुढील प्रश्नांना काही उत्तर, किंवा दिशा त्यातून मिळाली का हा माझ्या दृष्टीने परिषदेच्या यशाचा सर्वांत महत्त्वाचा निकष आहे.

जनता पक्षापुढील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे घटक पक्षातील मतभेद. असे मतभेद असणारच. वृत्तपत्रे त्यांचा जेवढा गवगवा करतात तेवढे ते गंभीर नाहीत असे पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर यांनी सांगितले; पण केंद्रीय माहितीमंत्री लालकृष्ण अडवाणींचे मत तसे नाही. मतभेदांवर जाहीर चर्चा करण्याचे तीन वर्षे तरी थांबवा अशी सूचना त्यांनी केली. पक्षाच्या ऐक्याबद्दल आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी चंद्रशेखर यांनी मतभेदांना गौण लेखले; पण खरोखर ते गौण नसून त्यांना संघर्षाचे स्वरूप येऊ लागले आहे. हरियाना व उत्तरप्रदेशच्या मुख्य मंत्र्यांना आपल्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करून घेण्यासाठी विधिमंडळ पक्षाच्या बैठका बोलवाव्या लागल्या. महाराष्ट्रात जनता पक्षाच्या हाती सत्ता आली नसली तरी मतभेदांना संघर्षाचे स्वरूप येथेही येऊ पहात आहे याची चुणुक रा. स्व. संघावर टीका करणाऱ्या 'स्रोत' या पुस्तकाच्या विक्रीच्या प्रश्नातून झालेल्या मारामारीने दाखवून दिली.

भिन्न भूमिका व कार्यक्रम असलेले पक्ष एकत्र येऊन जनता पक्ष स्थापन झाला तेव्हाच हे पक्ष एकत्र नांदणार कसे? अशी शंका व्यक्त करण्यात येत होती. आपण एकत्र राहिलो नाही तर सत्ता टिकणार नाही हे माहीत असल्यानेच ते एकत्र राहिले आहेत असे म्हणणे कितपत योग्य होईल? पण ते एकत्र राहण्याचे एवढेच कारण असेल तर जनता पक्षाला सर्वसामान्य जनतेचा पाठिंबा फार काळ राहणार नाही. जनता पक्षाने लोकशाही पुन: प्रस्थापित केली हे खरे; पण तेवढ्याने जनतेचे समाधान झालेले नाही. बेकारी, दारिद्र्य, दलितांचे प्रश्न सोडविण्याचा कार्यक्रम अधिक वेगाने हाती घ्यावयास हवा. याबाबतीत जनता सरकार काँग्रेस राजवटीपेक्षा निश्चित पुढे पावले टाकीत आहे याचा प्रत्यय यायला हवा. तसा ठसा जनता सरकार अजून उमटवू शकलेले नाही हे मान्य करायला हवे आर्थिक धोरण व कार्यक्रमाची आखणी सरकारने केली आहे; पण त्याच्या अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित झालेले नाही. घटकपक्षांची भांडणे मिटविण्यातच पक्षाची शक्ती खर्च होत आहे. ही भांडणे किंवा झगडे तात्त्विक नसून पक्षावर प्रभुत्व मिळविण्यासाठी आहेत. उत्तरेकडील राज्यात जनसंघ आणि भारतीय लोकदल यांनी इतर घटक पक्षांना डावलून सत्तेचे म्हणजेच मंत्रिपदाचे वाटप आपसात केले आहे. पक्षापुढील आजच्या समस्यांचे मूळ या प्रवृत्तीत आहे. महाराष्ट्रातील जनता पक्षही त्याला अपवाद नाही तेथेही जनसंघ. समाजवादी आणि इतर घटक पक्ष यांच्यात संघर्ष आहेतच; पण सत्ता हाती नसल्याने त्यांना तीव्र स्वरूप आलेले नाही. विधानसभा निवडणुकीनंतर उत्तमराव पाटील यांना नेतेपदी निवडून आणून जनसंघाने आपला प्रभाव दाखविला. महाराष्ट्राच्या जनता पक्षात जनसंघ सर्वांत मोठा गट असेल; पण ब्राह्मणांचा, मध्यमवर्गीय, पांढरपेशांचा पक्ष अशीच जनसंघाबद्दलची प्रतिमा जनतेत ठसलेली आहे, जनसंघाचा प्रभाव जनता पक्षावर राहणार असेल तर जनता पक्षाबद्दलही अशीच प्रतिमा निर्माण होईल. किंबहुना विधानसभा निवडणुकांच्या वेळी जनता पक्षाबद्दल काही प्रमाणात असा ग्रह असल्यामुळेच त्याला निर्णायक बहुमत मिळू शकले नाही, असे म्हटले जावे यात काही अंशी तथ्य आहे. पक्षकार्यकर्त्यांनी याबाबत आत्मचिंतन करून पक्ष कोणत्याही एका गटाच्या प्रभावाखाली जाणार नाही, सर्व घटक पक्षांच्या विचारविनिमयाने धोरण व कार्यक्रम ठरेल, पक्षात सर्व पातळ्यांवर त्यांना योग्य प्रतिनिधित्व मिळेल याची दक्षता घ्यावयास हवी. यासाठी पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे घटक पक्षांनी आपले स्वतंत्र अस्तित्व खऱ्या अर्थाने विसर्जन करायला हवे. पुण्यातील परिषदेच्या वेळी काही घटक पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या वेगळ्या बैठका झाल्या, हे आता थांबायला हवे. पक्षाची रीतसर सभासद-नोंदणी होऊन नव्या समित्या व पदाधिकारी निवडले गेल्यावर हे संघर्ष मिटायला हवेत.

मी पूर्वी एका लेखात म्हटल्याप्रमाणे जनता पक्ष हे जनतेने निर्माण केलेले हत्यार आहे. हा काही केवळ चार-पाच घटकपक्षांनी एकत्र येऊन स्थापलेला पक्ष नाही' कोणत्याही घटक पक्षाशी जे बांधलेले नाहीत असे अनेक कार्यकर्तेही या पक्षात आले आहेत, येत आहेत. पक्षाचे धोरण व कार्यक्रम ठरविण्यात, पदाधिकारी निवडण्यात, संघटना बांधण्यात त्यांचाही सहभाग राहणार आहे. जनता पक्ष हा खऱ्या अर्थाने जनता पक्ष बनायला हवा. घटक पक्षाचे पुढारी आणि त्यांचे अनुयायी एवढ्यापुरतीच त्याची व्याप्ती मर्यादित नाही हे लक्षात घ्यावयास हवे. हा आपला पक्ष आहे, त्याला प्रबळ बनविणे, संघटित बनविणे, शिस्तबद्ध बनविणे आणि जनतेची उद्दिष्टे साधणारे प्रभावी हत्यार त्यातून निर्माण करणे जनतेच्याच हाती आहे, ही जाणीव वाढायला हवी.

मतभेदांवर विचारविनिमय करून शक्यतो एकमताने, ते न जमल्यास बहुमताने निर्णय, सर्व पातळ्यांवर लोकशाही पद्धतीने काम व निर्णय ही जनता पक्षाची कार्यपद्धती आहे, असायला हवी. एका व्यक्तीने सर्व निर्णय घ्यावयाचे आणि सर्वांनी ते निमूटपणे मान्य करावयाचे ही इंदिरा राजवटीतील कार्यपद्धती होती. त्यातून हुकूमशाही येते. आणीबाणीत त्याचा अनुभव घेतल्यानंतर आता पुन: ती हुकुमशाही देशात यायला नको असेल तर लोकशाहीच्या रक्षणासाठी जनतेनेच संघटित झाले पाहिजे.

शेवटचा मुद्दा 'स्रोत' पुस्तकाच्या विक्रीवरून जे घडले ते योग्य होते का? ते टाळता आले नसते का? विचारप्रकटनाचे स्वातंत्र्य आणि भिन्न मतांच्या व्यक्तींनी एकत्र काम

करणे यांची योग्य सांगड घातली न गेल्याने हा संघर्ष उद्भवला. पुस्तकविक्रीला संघ कार्यकर्त्यांनी हरकत घ्यायला नको होती, पण जनता पक्ष परिषदेस संघाचे अनेक कार्यकर्ते आलेले होते. त्यांना दुखविणे योग्य नव्हे या विचाराने हे पुस्तक विकले जाऊ नये असा निर्णय संयोजकांनी आदल्या दिवशी घेतला असता त्याच्या विक्रीचा आग्रह धरणेही योग्य नव्हते. दोन्ही बाजूंनी अधिक समजूतदारपणा दाखवायला हवा होता. भिन्न मतांच्या व्यक्तींनी एकत्र काम करताना कसे वागायला हवे हे आम्ही अजून शिकलेलो नाही, हेच या घटनेने दाखवून दिले. □

## मुक्ताफळे

# □ साहित्यपरिषदेने काय काय बरे करावे ?

पुण्याच्या टिळकमार्गावर एक टुमदार इमारत आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद. या परिषदेचे वर्णन अनेकांनी केले आहे. कै. मामा वरेरकर हे, पुण्याचे कुणी ज्येष्ठ लेखक भेटले, की त्यांना म्हणत असत–

' तुम्ही पुण्याच्या लेखकांनी टिळक रोडवर छान ' बाथरूम ' बांधली आहे !

अर्थात हे आपले गंमतीने घ्यायचे बरं का! कारण माणूस जेव्हा दुसऱ्याची कुचाळकी करतो तेव्हा ती सर्वांनी गंमतीने घ्यावी अशीच नसते का त्याची अपेक्षा ? तसे मामांच्या वर्णनात फारसे चुकले असेही नाही टिळकपथावर पुणे नगरपालिकेने ' तशी ' चांगली सोय केलेली नसल्याने, मार्गावरील असंख्य जाणकार पादचारी जाता-येता आत शिरून परिषदेला लाभ देतातच.

या परिषदेचे नानाविध उपयोग पुणेकरांना होतात. परिषदेचे एक सुव्यवस्थित ग्रंथालय आहे व अभ्यासक त्याचा उपयोग करतात, हा किरकोळ लाभ झाला. कारण अभ्यासक अतिअल्प असतात आणि अशी अनेक भव्य ग्रंथालये पुण्यात आहेत. तेथील ग्रंथपाल कुणी अभ्यासक येतो काय याची वाट पहात असतात. असो ! मुख्य म्हणजे परिषदेचे एक सभागृह आहे तिथे व्याख्यान, परिसंवाद वा सभा नसेल तेव्हा ते भाड्याने मिळते. त्याचा लाभ असंख्य जोडपी घेतात. ' रिसिप्शनला यायचं बरं का ' अशी आग्रहाची असंख्य बोलावणी ही मंडळी करतात. अहेराच्या रकमेतून परिषदेच्या सभागृहाचे किरकोळ भाडे देणे त्यांना मुळीच जड वाटत नाही.

पण पुण्याच्या पत्रकारांना परिषदेचा उपयोग होतो तो अधिक महत्त्वाचा. पत्रकार हे असामान्य बुद्धिमत्तेचे व ज्वलंत प्रतिभेचे खंदे लेखक असतात. त्यांचे लेख आवडल्याची शेकडो पत्रे वाचक पाठवितात. यामुळे ते उत्साहाने अधिक अधिक ज्वलंत लिहितात. एखादे वेळी लिहायला विषय नसतो अशा वेळी परिषद हाताशी येते. खरे पहाता प्रतिभावंतांना विषयाची वाण पडू नये, पण एखादे वेळी पोहरा रिकामा वर येत रहातो. मग परिषदेवर कडाडून लिहिता येते ' परिषदेत सावळा गोंधळ ' ' परिषदेत प्रकाशकांची पुंडाई ' किंवा ' परिषद डबघाईला आली ! ' असे काहीही विषय रंगवता येतात. लिहिणारे साहित्यिक, परिषद चालविणारे साहित्यिक यामुळे धमाल उडते. वादावादीला तोंड लागते. पाठोपाठ लेखमाला लिहिण्याइतका मसाला गोळा होऊन जातो.

आता परवाचीच गोष्ट. साहित्यपरिषदेच्या कार्यकारिणीच्या एका सभासदाने ' तरुण भारत 'त एक मुलाखत दिली. परिषदेसंबंधी अधिकृतपणे बोलण्यासाठी कार्याध्यक्ष व चिटणीस असतात, यांनी मुलाखत का दिली ? इतरांनी मुलाखत देऊ नये असा काही नियम आहे का ? नेहमी नेहमी कार्याध्यक्षांचीच मुलाखत का ? त्यांचीच प्रतिक्रिया का ? प्रतिक्रिया सर्वांना असू शकते. तर या मुलाखतीत एक किरकोळ तक्रार नमूद होती. ती अशी–

' परिषदेच्या ग्रंथालयालाही अनेक दैनिके, साप्ताहिके, मासिके भेट म्हणून येतात. पण पत्र पाठवूनही ' सोबत ' येत नाही. अर्थात त्यांची इच्छा ! '

आता यात राग येण्यासारखे काही आहे का ? आपण मला जेवायला बोलावयला हवे होते ! नाही बोलावलेत आपली इच्छा ! कु. सुरेख दर्शने ही सुंदर मुलगी मला सांगून यायला हवी होती. तसे सुचवूनही ती आली नाही. तिच्या बापाची इच्छा ! व्यवहारात हे चालतेच. यामुळे व्यवहारचतुर 'सोबत'कार रागावले असे आम्हाला मुळीच वाटत नाही. पण त्यांना विषय मिळाला ! मग काय ते एकतात !

त्यांनी मुलाखतीवर भडिमार केला–

' फुकटचा कुठला ? उर्मट आणि अहंमन्य प्रकाशकांच्या हातून मी परिषद सोडविली. तुमच्यासाठी प्रचार केला म्हणून तुम्हाला ही मुलाखत देण्याची संधी मिळाली. काही उपकार स्मरा फुकटोबा ! '

आता इथे विषय संपायला हवा. चहा पिणाऱ्याचा हात धरता येतो, चिवडा खाणाऱ्याचा धरता येतो; पण लिहिणाऱ्या संपादकाला ' आता पुरे ' कोण म्हणणार ? संपादकांनी पुढे लिहिले–

' आमची ३५ रुपये वर्गणी परिषदेला जड आहे काय ? परिषदेत चहा-चिवड्याचा खर्च किती होतो ? परिषदेला टेप-रेकॉर्डर घ्यायला पैसे असतात. गावातल्या गावात टॅक्सीने फिरणे त्यांना परवडते; मग कोणाच्याही आश्रयाशिवाय, जाहिरातीशिवाय चालणारे ' सोबत ' परिषदेला फुकट मिळावे ही इच्छा व्यक्त करणे केवळ दुष्टपणाचे आहे ! '

आमचे म्हणणे ' सोबत 'चे वर्गणीदार वगळता या महाराष्ट्रात दुष्ट माणसांची इतकी संख्या असेल याची कुणालाच कल्पना नसेल. किती तरी लोकांनी T. V. घेतला आहे, घरात दोन दोन ट्रान्झिस्टर घेतले आहेत, बायकोला उंची उंची साड्या घेतात, घरात माणसांपेक्षा हातावरची धरून घड्याळे दुप्पट असतात, हॉटेलात जाऊन चिकन खातात, आठवड्याला बाल्कनीत बसून कधी

बायकोबरोबर तर कधी इतर कुणाबरोबर सिनेमे पाहतात, किर्लोस्कर-स्त्री मनोहर-सारखी मासिके आणि इलस्ट्रेटेड विकली, डायजेस, स्पॅन आणि उच्च अभिरुची सिद्ध करण्याकरिता 'साधना', 'माणूस' आणि 'सत्यकथा' घेतात हरामखोर! आणि हे सगळे करायला ज्यांच्याजवळ पैसे आहेत त्यांनी 'सोबत'ची वर्गणी भरू नये हे देखील दुष्टपणाचे आहे. या एकेका दुष्ट माणसाला समजा वेचून वेचून संपादकांनी लिहिले तर महाराष्ट्रातील दुष्टपणाची चांगली मोजदाद तरी होईल.

परिषदेकडून आपल्या वार्षिक इतिवृत्तात यापुढे वर्षातील चहा-चिवड्याचा हिशोब मागण्याची वेळ आलेली आहे. चहा, चिवडा, केळी, भजी, सामोसे, बिस्किटे याचा कुणी कुणी व कोणकोणत्या दिवशी फन्ना केला त्याची नावानिशीवार यादी परिषदेने जनतेपुढे ठेवली पाहिजे तरच याला आळा बसू शकेल!

पण 'सोबत'कारांनी केवळ टीका केलेली नाही. त्यांनी काही विधायक सूचना केल्या आहेत. इतरांचे अनुभव नमूद केले आहेत.

एकदा 'सोबत'कारांना पुस्तके हवी होती. चि. त्र्यं. खानोलकरांवर बोलण्यासाठी. बोलायचे परिषदेतच होते. तरी कार्याध्यक्षांनी ती त्यांना दिली नाहीत. वस्तुतः खानोलकरांवर बोलण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तीने खानोलकरांची समग्र पुस्तके विकत घ्यायला नकोत का?—असे कारण दाखवून कार्याध्यक्षांनी 'नकार' दिला असता तर ते सकारण तरी झाले असते. याउलट श्री. बेहेरे यांनी मॅजेस्टिकच्या श्री. कोठावळ्यांना नुसते सहज म्हटले तर त्यांनी खानोलकरांची पुस्तके त्यांच्या हातावर ठेवली. या अनुभवावरून 'सोबत'कार परिषदेला सांगतात—

'परिषदेतील कार्यक्रम रंगत नाहीत आणि मॅजेस्टिकच्या गप्पात लेखक विनामूल्य, खुषीने का सहकार्य करतात हे सहज लक्षात येईल.'

परिषदेच्या काही लक्षात येईल असे आम्हास वाटत नाही. जर कोठावळे यांचे यश व सोबतकारांना लाभलेले त्यांचे प्रेम परिषदेला हवे असेल तर त्यांनी काही गोष्टी त्वरित करणे आवश्यक आहे.

पहिली गोष्ट म्हणजे महाराष्ट्र सरकारी लॉटरीची सोल एजन्सी परिषदेने मिळवावी. परिषदेचा शिक्का असलेले तिकिट एकदा का सगळे जण खरेदी करू लागले की अशा लाखो तिकिटांमागे हजारो रुपये रोज परिषदेकडे जमा होतील. पैसाच पैसा उपलब्ध झाला की विनामूल्य परतभेटीदाखल अंक मागविण्याची परिषदेवर पाळी येणार नाही.

निमंत्रणे पाठवून गर्दी जमत नाही, विद्वान भाड्याने (जाण्यायेण्याच्या) आणता येतात हा परिषदेचा गैरसमज आहे. विद्वान आणि थोर थोर लेखकांना जाहिरात हवी असते. आपण थोर विचारवंत आहोत आणि अवघा महाराष्ट्र आपल्या वक्तव्याची वाट पहात आहे असा त्यांचा गोड समज असतो. आपण वाचकांचे 'ग्लॅमरबॉय' आहोत, असाही सर्वांचा आग्रह असतो. यासाठी कार्यक्रमाचे वृत्तान्त वृत्तपत्रात छापून येण्याची व्यवस्था करणे परिषदेला जमले पाहिजे.

सगळे प्रश्न त्यामुळे सुटतील असे नाही. कारण कसब काही उसने आणता येत नाही. परिषद ही सार्वजनिक संस्था असल्याने तिथे काही नियम असणारच काही प्रमाणात जाब लोकांना द्यावा लागणारच. म्हणून कार्यकारिणीने प्रतिवर्षी परिषद लिलावाने कुणाला तरी चालवायला द्यावी. लिलाव? येस् लिलाव! जसा तळ्यातल्या गणपतीचा होतो! म्हणजे गणपती विश्वस्तांचा; पण तो चालविण्याची ताकद असलेले लोक लिलाव घेऊन विश्वस्तांचे व आपलेही भले करतातच की नाही?

तेव्हा असा लिलाव आवश्यक आहे मग एखादे वर्षी हा लिलाव 'सोबत' कार श्री. गणपती बेहेरे घेतील, आणखीही कुणी घेऊ शकतील. परिषदेला तरच 'बरे दिवस' येतील. मग कार्यक्रमांना खेचाखेच गर्दी होईल. 'औंधकरांची पुण्यतिथि'ची सभा असली तरी दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात समग्र वृत्त येईल. सर्व जण परिषदेच्या 'बाथरूम'-कडे पंचे आणि पळीपंचपात्री घेऊन धावत सुटतील!

असा काही शहाणपणा परिषदेच्या कार्यकारिणीला सुचो. गणपती ही बुद्धीची देवता आहे. साहित्यकारांचे ते दैवत आहे. म्हणून आम्ही एवढेच म्हणू—

गणपती तुझी सोंड वाकडी
दे दयानिधे बुद्धी चांगली

—ग्यानबा


**NEW TITLES RECEIVED**

1. In Jail – (Politics) – Kuldip Nayar — Rs. 25–00
2. Hopscotch – (Best mystery novel) – Brian Garfild — „ 11–00
3. The Ninth Man – (Bestseller–novel) – John Lee (Plot to murder Roosevelt) — „ 14–10
4. Saving The Queen – (Bestseller–Spy Story) – Jr. William F. Buckley — „ 9–95
5. The Family Arsenal – (Bestseller–novel) – Paul Theroux — „ 21–80

**मराठी**

१. निवडक प्रेमचंद – (कथासंग्रह) – प्रेमचंद — रु. ७–००
२. दैवारंभ अर्थात ज्योतिष-शिक्षक – विठ्ठल श्रीनिवास देशिंगकर — „ १०–००

- पुस्तकांच्या किमती फार भडकल्या आहेत! पुस्तके खरेदी करण्यापेक्षा एखादी चांगली लायब्ररी लावा!
- फिनिक्स एक आगळे वेगळे वाचनालय!!!
- दीर्घ मुदतीच्या वर्गणीत उत्कृष्ट पुस्तके वाचा.

**THE PHOENIX LIBRARY**
727, Opp. Sadashiv Post, Pune–411 030

आदिवासी विकासकार्यक्रमात आणि रोजगारहमी या दोन विषयांवर यंदाच्या ग्रामायन मेळाव्यात (१ व २ एप्रिल १९७८) अनुभवी कार्यकर्ते व अभ्यासक यांनी तपशीलपूर्वक चर्चा केली. आदिवासी विकास कार्यक्रमावर झालेल्या चर्चेचा गोषवारा गेल्या अंकी दिला. या अंकी–

# रोजगार हमी योजना आणि 'ग्रामायन'

संकलन : प्रा. व्ही. डी. देशपांडे

ग्रामीण भागातील बेकारी व अर्धबेकारीचे निर्मूलन करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने १९७२ सालापासून मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू केले. त्याची परिणती 'रोजगार हमी' या योजनेत झाली. ती दोन वर्षे राबविल्यानंतर तिचे कायद्यात रूपांतर करण्यात आले आणि आज हा कायदा राष्ट्रपतींकडे संमतीसाठी पडून आहे.

महाराष्ट्राच्या आणि विशेषतः महाराष्ट्रातील ग्रामीण भागाच्या जीवनात ही योजना व हा कायदा फार महत्त्वाचा व दूरगामी परिणामकारक असा आहे याबद्दल फारसे दुमत नाही. अर्थातच ही योजना मनापासून, प्रामाणिकपणे आणि कार्यक्षमतेने राबविली तरच! एरव्ही अनेक पुरोगामी कायद्यांचे जे झाले ते याही कायद्याचे होऊ शकेल. या कायद्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी होण्यासाठी या कायद्याची माहिती सर्वत्र पसरणे हे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर सर्वत्र व विशेषतः ग्रामीण भागात परिवर्तनाचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये या विषयाची सतत, सखोल व अनुभवाच्या संदर्भात चर्चा होणेही आवश्यक आहे. ग्रामायन या संस्थेने हा विषय प्रथमपासूनच जिव्हाळ्याचा मानला. त्याचा प्रसार करणे व कार्यकर्त्यांच्या अनुभवांचे संकलन करणे हे ग्रामायनच्या कार्यकर्त्यांनी एक आपले प्राथमिक महत्त्वाचे काम मानले. दि. १–२ एप्रिल १९७८ रोजी या विषयावर पुन्हा एकदा कार्यकर्त्यांची चर्चा आयोजित केली. या चर्चेचा गोषवारा थोडक्यात येथे देण्याचा प्रयत्न आहे.

रोजगार हमी योजनेचा तपशील थोड्याफार प्रमाणात आता सर्वश्रुत असल्यामुळे पुन्हा त्यावर भर देण्याचे कारण नाही. नवीन कायद्याप्रमाणे सरकारने मागेल त्याला काम देण्याची हमी दिलेली आहे. कष्टकऱ्याने नोटीस दिल्यापासून १५ दिवसांचे आत सरकारने त्यास काम दिले पाहिजे; तसे न दिल्यास रोजी एक रुपयाप्रमाणे नुकसानभरपाई दिली पाहिजे. सरकार देईल ते काम कष्टकऱ्याने स्वीकारले पाहिजे. कामावर सात दिवसांचे आत हजर राहिले पाहिजे आणि एका वेळेस सात दिवसांपेक्षा अधिक अगर एका महिन्यातून एकूण सात दिवसांपेक्षा अधिक काळ गैरहजर राहता कामा नये.

पूर्वीच्या योजनेतील सर्व जबाबदाऱ्या सरकारने स्वीकारलेल्या आहेतच. उदा. कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, लहान मुलांना सांभाळण्यासाठी व्यवस्था, घरापासून कामाचे ठिकाण ५ कि. मी. पेक्षा लांब असल्यास राहण्यास झोपडी इत्यादी किमान सुखसोयी सरकारने उपलब्ध करून द्यावयाच्या आहेत. हा सर्व तपशील येथे देण्याची गरज नाही. कार्यकर्त्यांनी या योजनेतील दाखवून दिलेल्या उणीवांचाच फक्त या लेखात उल्लेख केला आहे.

## कामे वेळेवर निघावीत

ग्रामीण भागात काम करणाऱ्यांना या योजनेबाबत बऱ्याच उणीवा दिसतात. पहिली महत्त्वाची उणीव कामासंबंधी. एक सर्वत्र ऐकू येणारी तक्रार अशी की, कामे वेळेवर काढली जात नाहीत. फार दिरंगाई होते. त्यामुळे कष्टकऱ्यांना 'जगण्यासाठी' गाव सोडून फिरत रहावे लागते, उसनवारी करावी लागते. ही परिस्थिती पालघर तालुक्याची पाहणी करताना 'ग्रामयन'च्या कार्यकर्त्यांनाही दिसून आली. पालघर तालुका हा प्रामुख्याने आदिवासी लोकांचा भाग. येथील शेतीबाबतची प्रगती जेमतेमच. भूमिसिंचनाची व्यवस्था अजिबात नाही असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. आधुनिक तंत्राचा स्पर्शही या भागास झालेला नाही. त्यामुळे फक्त भातशेती व तीसुद्धा कनिष्ठ दर्जाची. भूमिहीनांना खरीप हंगामात कसेबसे काम मिळते. त्यातही सप्टेंबर महिना पूर्णपणे बेकारीचा जातो. या परिस्थितीत भूमिहीन व लहान शेतकरी यांची धडपड असते ती मोठ्या शेतकऱ्याकडे वर्षाच्या निदान खरीप हंगामाच्या बोलीवर करार करून राहण्याची. असे कंत्राट फायदेशीर नसते; परंतु तरीही त्यात किमान सुरक्षितता आहे म्हणून त्यासाठी कष्टकरी जीव टाकतात. याचा परिणाम असा होतो की, इतरत्र बऱ्यापैकी मजुरी मिळणारे काम मिळूनदेखील कष्टकऱ्यास ते स्वीकारण्याचे स्वातंत्र्य नसते. ज्यांना अशा करारात सापडण्याचे भाग्य लाभत नाही ते एक तर दूरच्या ठिकाणी काही महिने निघून जातात किंवा तिथेच काम मिळण्याची आशा बाळगीत दिवस काढतात. पाहणीत असे दिसून आले की, जर वेळेवर कामे काढली तर कष्टकऱ्यांना अशा करारात सापडून घेण्याची गरज भासत नाही, त्याचप्रमाणे गाव सोडून जाण्याचीही गरज भासत नाही; परंतु गावोगावी जाऊन कोणत्या वेळी काम काढणे आवश्यक आहे याची पाहणी अगर विचार शासनाधिकारी करीत नाहीत.

काही भागात योग्य प्रकल्पांचा अभाव असतो असेही दिसून येते. उदाहरणार्थ डोंगराळ भागात योग्य अशी कामे नाहीत अशी अधिकाऱ्यांची तक्रार असते. रोजगार हमी योजनेखाली घेतली जाणारी कामे उत्पादक स्वरूपाची असावीत असे अभिप्रेत आहे. डोंगराळ भागात उत्पादककामे नाहीत. जी कामे या भागात महत्त्वाची वाटतात ती उत्पादक या सदरात मोडत नाहीत. उदाहरणार्थ रस्तेबांधणीची कामे अनुत्पादक धातली गेली आहेत; परंतु अशा भागात ही कामे अतिशय महत्त्वाची आहेत हे आपण विसरता कामा नये. स्थानिक परिस्थितीस अनुसरून प्रकल्पांचे महत्त्व आपण ठरविल्यास हा प्रश्न सुटू शकेल आणि गरजेप्रमाणे कामे हाती घेऊन प्रादेशिक

विकास व रोजगारनिर्मिती ही दोनही उद्दिष्ट साध्य धरता यतील.

कामासाठी काम हे योजनेचे उद्दिष्ट नसून प्रादेशिक विकासास आवश्यक असे प्रकल्प पार पाडणे हे योजनेचे प्रमख उद्दिष्ट असल्याचे सांगितले जाते. या उद्देशाप्रमाणे तालुका, पातळीवर स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन विकासयोजना आखण्याचे काम हाती घेतल्याखेरीज योजना यशस्वी होणार नाही ही एक मूलभूत महत्त्वाची गोष्ट आहे. आज तालुक्यासाठी 'संकल्पचित्र' (Blue print) तयार केले जाते. बऱ्याच ठिकाणी असे दिसून आले आहे की, संकल्पचित्र तयारच नसते. असले तरी ते फारच जुजबी असते. स्थानिक पातळीवरील आर्थिक, नैसर्गिक समस्या लक्षात घेऊन संकल्पचित्र तयार करण्याचे प्रयत्न दुर्मिळच म्हणावे लागतील. किंबहुना यात शास्त्रशुद्ध पद्धतीने संकल्पचित्र तयार करण्यास अजून प्रारंभ व्हावयाचा आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. हा प्रारंभ कसा होणार? याची जबाबदारी कोणाची? स्थानिक पातळीवरील विचारवंत, शेतकरी, उद्योगपती, कामगार इत्यादींचे सहकार्य या कामात कसे घ्यावयाचे? इत्यादी अनेक प्रश्न या संदर्भात निर्माण होतात. हा एक महत्त्वाचा विषय आज उपेक्षित आहे.

## नियंत्रित ठेकेदारी

या योजनेखाली हाती घेतलेली कामे ठेकेदारास देऊ नयेत असा सर्वसाधारण दंडक आहे. यापाठीमागील हेतु असा की, ठेकेदार कष्टकऱ्यांना योग्य मोबदला देईलच असे नाही. हा हेतु योग्य असला तरी प्रत्यक्षात या नियमामुळे चांगले प्रकल्प हाती घेऊन ते तडफेने पार पाडण्याची क्रिया मंदावते. खात्यामार्फत कामे रेंगाळत राहतात. कामगारांनाही वेतन पुरेपूर मिळतेच असे नाही. भ्रष्टाचार अटळ ठरतो. हे सर्व लक्षात घेता ठेकेदारास कामे न देण्याचा नियम कितपत योग्य आहे अशी शंका आज अनेक कार्यकर्त्यांच्या मनात येत आहे. प्रादेशिक विकास जर जलदगतीने साधावयाचा असेल तर उत्तम दर्जाच्या प्रकल्पांना प्राधान्य देऊन ते झटपट पुरे करणे अगत्याचे आहे. ठेकेदारांवर योग्य ती नियंत्रणे ठेवून त्यांच्याकडून कामे करवून घेण्याची कल्पना आज अनेकजण मांडताना दिसतात. या कल्पनेचा सर्व बाजूंनी विचार करून निर्णय घ्यावयास हवा.

नवीन योजनेप्रमाणे खाजगी मालकीच्या क्षेत्रावरील कामेही या योजनेखाली घेता येतात. ही गोष्ट स्वागतार्ह आहे. जमीनमालकास खर्चाच्या ३३⅓ टक्के अनुदान देण्याची तरतूद आहे. हा नियम सरसकट सर्वांना लागू करण्यात मात्र अर्थ दिसत नाही. जमिनीचा विकास हा जर या तरतुदीमागील हेतू असेल तर एक महत्त्वाची गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे; बहुसंख्य लोक लहान शेतकरी आहेत. त्यातील बरेचसे अतिअल्पभूधारक आहेत. या लोकांची जमीनसुधारणेची कामे महत्त्वाची आहेत. ती या योजनेखाली पार पाडावयाची असल्यास, अनुदानाचे प्रमाण अधिक हवे. ज्या दलिताना नव्याने जमिनी मिळालेल्या आहेत. त्यांना व त्याचप्रमाणे आदिवासी इत्यादी गरीब शेतकऱ्यांना या तरतुदीचा पूर्ण फायदा देण्याची खटपट या योजनेमार्फत करावयास हवी.

रोजगार हमी योजनेखाली कामे सुरू करण्यापूर्वी काही अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे. त्याबाबतही कार्यकर्त्यांच्या मनात शंका आहेत. कामे सुरू करण्यापूर्वी शेतीस व सरकारी विकासयोजनास लागणारा मजूरपुरवठा योग्य प्रमाणात होत असला तरीसुद्धा बऱ्याच लोकांना रोजगार हवा आहे अशी संबंधित अधिकाऱ्यांची खात्री पटली पाहिजे. अशी दक्षता न घेता कामे सुरू केल्यास मजूरवर्ग मोठ्या प्रमाणावर सरकारी कामावर हजर राहील आणि त्यामुळे शेती-धंद्याचे नुकसान होईल अशी सरकाला भीती वाटते. शेतीधंद्याचे नुकसान होऊ नये असे वाटणे साहजिक असले तरी अशी अट घातल्यामुळे तिच्या आधाराने कामे सुरू करण्यात दिरंगाई होण्याची दाट शक्यता आहे. काही प्रमाणात बेकारी असल्याखेरीज मजुरीचे दर खाली येणार नाहीत. त्यामुळे शेतकरीवर्ग रोजगार हमी योजनेखाली कामे काढू नयेत यासाठी दडपण आणीत राहील. शिवाय शेतीस मजूरपुरवठा पुरेसा आहे की नाही हे ठरवायचे कसे हा प्रश्न आहेच. त्यासंबंधी निश्चित मार्गदर्शन उपलब्ध नाही. शेतमजुरास खाजगी शेतावरील कामातही किमान वेतन मिळण्याबाबत कायदा झालेला आहे. रोजगार हमी योजनेत काम करणाऱ्यांनाही तेवढीच मजुरी पडावी अशी तरतूद आहे. असे असताना अधिक कामे काढल्यास शेतीवरील मजूरवर्ग शेतकाम सोडून सरकारी कामाकडे धाव घेईल ही भीती फारशी साधार वाटत नाही.

रोजगार हमी योजनेचे उद्दिष्ट नेहमीच्या विकासयोजनेतून निर्माण होणाऱ्या रोजगारीशिवाय अधिक रोजगार निर्माण करणे हे आहे. त्यासाठी या योजनेस लागणारा पैसा स्वतंत्ररीत्या शहरी नागरिकांवर कर बसवून गोळा केला जातो. नेहमीच्या विकासकार्यातून पुरेसा रोजगार निर्माण होत नाही. म्हणून विकासकार्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पैशापेक्षा अधिक पैसा उपलब्ध करण्यासाठी ही तरतूद आहे. तेव्हा साहजिकच अपेक्षा अशी आहे की, पंचवार्षिक योजनेत ठरलेले कार्यक्रम आणि रोजगार हमी योजनेखाली घेतले जाणारे कार्यक्रम यांची गल्लत होऊ नये. परंतु प्रत्यक्षात असे दिसते की, हा फरक पाळला जात नाही. नेहमीच्या विकासयोजनेतील काही कामे कमी करून तीच रोजगार हमी योजनेखाली घेतली जातात. पूर्ण योजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा प्रघात चुकीचा आहे. खास कर बसवून गोळा केलेला पैसा जर या योजनेसाठी वापरला जात नसेल तर हे आक्षेपार्ह आहे.

हवे असेल तेव्हा काम आणि किमान वेतन या दोनही बाबतीत सरकारने जबाबदारी स्वीकारली आहे. प्रत्यक्षात दोनही बाबतीत आजपर्यंत जबाबदारी पूर्णपणे पार पाडली गेलेली नाही. काम हवे तेव्हा व हवे त्यांना मिळतेच असे नाही. त्यात सर्व प्रकारच्या अडचणी येतात. आपल्या ग्रामीण भागातील गरीब कष्टकरी अशिक्षित, भिडस्त व दबलेला आहे. मोठ्या शेतकऱ्यांना खूष ठेवणे त्याला भाग पडते. तसेच गावप्रमुख, सरकारी अधिकारी यांच्यापुढे जाऊन आपले हक्क प्रस्थापित करण्याची कुवत त्याचेजवळ नाही. आपणास हवे तेव्हा काम देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे जाऊन नोटीस देणे इत्यादि औपचारिक नियमांचे पालन त्याच्याकडून व्हावे अशी अपेक्षा आपण बाळगणे अवाजवी वाटते. म्हणून या बाबतच्या सर्व नियमांची फेरविचारणा व्हावयास हवी.

मजुरीचे बाबतीतील अनुभव तर सर्वश्रुत आहेतच. किमान दरापेक्षा पुष्कळच कमी मजुरी पदरात पडते. कामाला लागताना आपल्या कामाचे मोजमाप होऊन आपणास किती मजुरी पडेल याचा अंदाज कष्टकऱ्यास येत नाही. त्यास मोजमाप कसे केले जाते याची माहितीही दिली जात नाही. अशी माहिती देण्याबाबत सर्व नियम योजनेत आहेत; परंतु त्यांची अंमलबजावणी कोठेही झाल्याचे दिसत नाही.

योजनेव्यतिरिक्त सरकारी कामे असतात तिथे मजुरीच्या दरात बराच फरक दिसून येतो. ही तफावत गेली पाहिजे. नवीन कायद्यानुसार १५ दिवसांपेक्षा मजुरी मिळण्यास उशीर लागता कामा नये. मजुरी बाजाराचे आदले दिवशी मिळावी अशीही योजनेत तरतूद आहे. प्रश्न आहे अंमलबजावणीचा.

त्यातही एक अडचण अशी की, सरकार काम देण्यास अगर नुकसानभरपाई देण्यास असमर्थ ठरले तर कष्टकरी कोर्टात जाऊन दाद मागू शकत नाही!

योजनेच्या अंमलबजावणीसाठी सर्व स्तरांवर समित्या इ. निर्माण करण्याचे योजिले आहे. प्रथमदर्शनी ही व्यवस्था विचारपूर्वक तयार केलेली वाटली तरी प्रत्यक्ष आजपर्यंतचा अनुभव लक्षात घेतल्यास त्यातील उणीवा लक्षात येतात. काही ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी व अभ्यास करून अंमलबजावणीची व्यवस्था तपासून पहावयास हवी. कार्यकर्त्यांचा विचार व सूचना यांचा विचार करावयास हवा. □

# सेठ चंदूलालजी एक ' मुलीचा बाप '

पु. ल. इनामदार

मानसशास्त्राच्या आधारावर पुरोगामी विचारांचा पाठपुरावा करताना काही काही गोष्टी ठोकताळेपणाने सांगितल्या जातात. गरिबी–श्रीमंतीमधील जीवघेण्या खाईचे वर्णन करताना फ्रान्समधल्या व विशेषेकरून पॅरिसमधल्या गरीब मजदुरांच्या अर्धपोटी अवस्थेबद्दल फ्रान्सची महाराणी मेरी अंतोइन इला सांगितले असताना, तिने विचारलेला उत्तरादाखलचा प्रश्न प्रसिद्ध आहे. ती म्हणाली होती, 'या गरीब लोकांना पाव–डबलरोटी खायला मिळत नाही, तर ती माणसं केक्स का नाही खात ? ' ! भुकेपायी आतडी तुटत असता, भुकेल्या मुलाने भटाऱ्याच्या दुकानावर जाऊन, दुकानदाराची दृष्टी टाळून चोरलेल्या पावाची कथा व त्यावरून झालेल्या अपराध्याच्या मानसशास्त्रीच प्रेरणेची चर्चा मानसशास्त्राच्या अभ्यासकांना अपरिचित नाही. आपल्या भरतभूमीवर देखील पुरातन उदाहरणे मिळतात. दूध मागणाऱ्या अश्वत्थाम्याला पीठ कालवून पांढरे पाणी प्यायला देणारी माता, कोणा भारतीयाचे डोळे पालवीत नाही ? चारुदत्ताच्या दासीबद्दल वाटणाऱ्या प्रेमाच्या पोटी, चारुदत्ताच्या घरी अनामत ठेवलेले वसंतसेनेचे दागिने चोरणारा शर्विलक संगळयांच्या परिचयाचा आहे आणि त्या संदर्भात एकीकडे शर्विलकाच्या भित फोडण्याच्या कलेचे कौतुक करणारा आणि दुसरीकडे ' भिक्षा मागुनि दारोदारी, फेडिन ऋण गणिकेचे । परि कीर्तीला कलंक येइल ऐसे भाषण वाचे । नच हा उच्चारी ! ।' असे उदात्त अभिमानाने म्हणणारा चारुदत्त कुणाचे मन मोहून टाकीत नाही ? चारुदत्ताचे ते दर्शन आपले मन मोहून टाकते एवढेच नव्हे, तर शर्विलकाच्या चोरीच्या अपराधाची आठवणसुद्धा आपल्या मनात शिल्लक राहू देत नाही !

सांगण्याचे तात्पर्य एवढेच की, माणसाच्या हातून घडणाऱ्या कित्येक काय, प्रत्येक अपराधाला दुसरी बाजू असते. व ही दुसरी बाजू अपराध्याने केलेल्या नृशंसकृत्याइतकीच हृदयविदारक असते. विशेषतः एखादा अपराधी सातत्याने अपराधी कृत्ये करीत जातो, तेव्हा त्या अपराध्याची मानसिक विकृती नसेल तर, त्या सतत अपराध करण्याच्या पाठीमागे काही तरी, आपले मन हेलावून टाकणारा विकार असल्याचे पहायला मिळते. उघडया डोळयांनी कामे करणाऱ्या व पैशाच्या लोभाने बेमुर्वतखोर न झालेल्या वकिलाला असले अनुभव अनेकदा येतात. असल्याच एका जुगारी म्हणून प्रसिद्ध झालेल्या बापाची कहाणी आहे ही !

जुगारी बापाच्या कहाणीला आरंभ करण्यापूर्वी काही इतर परिस्थिती सांगणे योग्य होईल. मी १९३५ व त्यानंतरची हकीकत सांगत आहे. त्या दिवसांत मी कऱ्हाड–नागपूरकडे वयाची पंचवीस–अठ्ठावीस वर्षे चालवून, मग ग्वाल्हेर येथे वकिली करावयाला म्हणून जाऊन राहिलो होतो. ग्वाल्हेर येथील भाषा, चालीरीती, आशा–आकांक्षा, परस्पर संबंध व व्यवहार इत्यादि अनेक दृष्टींनी तेथील वातावरण मला अगदीच अपरिचित होते. कोर्टात जायला आरंभ केल्यानंतर माझा आरंभीचा पुष्कळसा वेळ बाररूममधेच बसून घालवावा लागे आणि सहाजिकच तेथल्या बरोबरीच्या वकीलमंडळींत मिसळून त्यांच्याबरोबर कोर्टातले कामकाज पहात, त्यांनी सांगितलेली कामे करीत त्यांच्या आमोदाप्रमोदात भागीदार होत राहणे, हे सगळे माझ्या वकिली·विद्या शिकण्याच्या अभ्यासक्रमातले एक आवश्यक व अपरिहार्य अंग व्हावे यात काही नवल नव्हते. कारण यामुळे तेथील उर्दूफारसीमिश्रित हिंदी भाषा तोंडात रुळायला मदत होई; तेथील कोर्टातलेच काय पण कोर्टाबाहेरचे रीतीरिवाज माहीत करून घेण्यास संधी मिळे. तेथील अशील–पक्षकार मंडळींची माहितीही मिळे. त्याच संदर्भात मला पहिलीच जाणविलेली एक आठवण संवादरूपानेच सांगतो. मी एका जम बसायला लागलेल्या नवीन–ज्यूनियर वकीलमहाशयांच्या घरी संध्याकाळचा चहा प्यायला म्हणून बसलो होतो तेथे आणखी दोन ज्यूनियर वकील होते. ते अर्थातच मला सीनियरच होते. कारण दोन वर्षांपासूनच ते वकील म्हणून कोर्टात जात असत. तेथे चहा–फराळ झाल्यावर विचारणा झाली,

'क्यों वकीलसाहब ? ताश का अड्डा बैठ जाय ? आप चौथे हाजिर हो हि किसके पार्टनर बनोगे ? ब्रिज खेलना जानते हो ना ? '

'नाही हो ! मी ब्रिज खेळत नाही ! '

'कोई बात नहीं. रमी का सिलसिला ही सही ! '

'नाही हो ! मी रम वगैरे काही पीत नाही ! ' माझे उत्तर ऐकून उठलेला हास्याचा विस्फोट शांत झाल्यावर, यजमानमहाशयांनी म्हटले, ' रम पिण्याचे नाही म्हणत हो ! पत्त्याचा रमी खेळ ! सोपा आहे अगदी आणि स्टेकही भारी नाही. एकन्नी पॉइंट ओनली ! '

'खरं सांगू का ? मला की नाही, पत्ते खेळताच येत नाहीत ! सवयच नाही मला ! '

' अरे ऽऽऽ बिलकुल ही अछूत! अरे हो पण ..तुम्ही खादी पेहेनता, नाही का ?'

'अरे, छोडो इन गांधीमहाराजको ! अपना वही इफ्तार बेढंगी रहेगा ! हम तो तीन पत्तेका फ्लॅशही खेले ! ' दुसरे सज्जन वकीलमहोदय म्हणाले.

' ठीक है, बेढंगी तो बेढंगी ! मगर चवन्नी पॉइंट रहेगा ! तीन पत्ता ऐसे वैसे नही खोला जायगा ! हां यार ! यहाँ तो अपन उसूल

के पक्के और साफ बात करनेवाले हैं. क्यों दोस्त ? ' तिसरे वकील-महोदय म्हणत होते. त्यांनी शर्टची कॉलर वरती ओढली व कोटाची बटने पुन्हा ठीक लावली व बाहीच्या टोकातून हातरुमाल बाहेर काढून तोंड पुसले ! तिघाही मराठी वकीलमहाशयांचा खेळ, 'तीन पत्तेका खेल' सुरू झाला. अन्नी, चवन्नी, अठन्नी, बँदा रुपया याप्रमाणे हिशोब व देवघेव सुरू झाली ! मी थोडयाच वेळात खेळाचा रागरंग बघून तेथून उठलो नी घरी परत आलो होतो !

बाररूममध्ये प्रकटपणे पत्त्याच्या खेळामधल्या हारजीतची चर्चा वकीलमंडळींत झालेली ऐकायला मिळायची. पुढच्याच दिवाळीत एक नवीन अनुभव मिळायचा होता. लक्ष्मीपूजनाच्या सुमुहूर्तावर किल्ल्यावरून तोफ वाजली. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे सकाळी सूर्योदयाची तोफ व रात्री साडेनऊ वाजता रात्रीची तोफ वाजत असल्याचे मला माहीत झाले होते; पण दिवेलागणीच्या वेळेची ही तोफ मला नवीन होती. म्हणूनच विचारले तेव्हा कळले की, ही 'जुवा' खेळायची तोफ ! लक्ष्मीपूजनाच्या दिवशी ह्या तोफेच्या वेळेपासून राजरोसपणे जुगार खेळायची परवानगी ! शर्त एवढीच की, रस्त्यावरून जुगार खेळलेला दिसू नये ! दिवाळीची दिव्यांची आरास व दुकानांची सजावट पहायला म्हणून बाहेर निघालो तर ठिकठिकाणी घरासमोर दारांवर दर्शनी पडदा म्हणून स्वच्छ पांढरी चादर सोडलेली, आत पेट्रोमॅक्स दिव्याचा फक्क उजेड आणि सूंऽऽ असा आवाज, त्या उजेडात आतमध्ये आठदहा मंडळींचा वर्तुळाकार फड बसलेला, वर्तुळाच्या परिघावरच एक जण 'नाले'चा डबा घेऊन बसलेला, व त्याच्यासमोर पत्त्यांचे कोरेकरकरीत कॅटस् ठेवलेले ! खेळ मुकाटयाने चाललेला; पण मध्येच खेळणाऱ्या भिडूपैकी कुणाचे तरी पत्ते समोर ठेवणे, नी 'मार दिया !' म्हणून ओरडणे व इतर खेळाडूंपुढे ठेवलेल्या पैशाच्या चळती लावसटाच्या तत्परतेने स्वतःसमोर ओढून मोजणे व नालेच्या डब्यात नाल टाकणे-त्यानंतर थोडी चर्चा होऊन दुसऱ्या कॅटस्नी दुसरा डाव सुरू ! खेळ चाललेला. पडद्याबाहेर चार पाच लोक आपले खिसे चाचपीत, आत जावे की नाही याचा विचार करीत घुटमळत असलेले. त्यातला एखादा खालच्या मानेने उभा राहून खिसे उलटे करून झाडीत असलेला ! असा जुगार-मुक्त जुगार लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर सुरू होई, तो त्या रात्रभर पाडव्याच्या सारा दिवसभर व रात्रभरही चालू राही. तो द्वितीयेच्या सकाळच्या साडेसहाच्या तोफेपर्यन्त ! त्यानंतर द्वितीयेला सकाळी जिकडे-तिकडे पोलिसपार्टीचे शिपाई हातात दंडुका घेऊन रस्त्यावरून फिरत 'जुवा बंद करो !' म्हणून सांगत असलेले व चालू असलेला जुगाराचा डाव पुरा करायची सवलत 'हमारा हक' वसूल करून उदार मनाने देत पुढे चालू लागत असलेले ! दिवाळीच्या सुटीनंतर बाररूममध्ये चर्चा कसली ? तर 'अमुक साहाब इतके रुपये हरले !' 'ह्या बेटा तकदीरवाला हं ! दोन हिरव्या नोटांची कमाई करून आला !' 'अरे यार ! छत्तीस घंटे जगकर खेले. खाने को भी नहीं उठे. नींद की जलन अभीभी बाकी है !' ह्या गोष्टी ! त्यानंतर थोडयाच दिवसात 'बेकायदा' जुगार खेळताना पकडलेल्या पाच सात, आठ दहा मुलजिम-अभियुक्त माणसांचे फौजदारी मुकदमे मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात पहायला मिळायचे. प्रत्येक मुकदम्यात थोडयाफार फरकाने कोर्टासमोर टेबलावर एका बाजूला मुद्देमाल म्हणजे एक जुनीपुराणीशी सतरंजी घडी करून ठेवलेली, एक साधा कंदील किंवा पेट्रोमॅक्सचा दिवा, दोन-तीन पत्त्यांचे डाव, टिनाचा नाळ गोळा करण्याचा डबा नि जप्त केलेल्या नोटा-पैश्यांच्या थैल्या, असायच्या दहा-पाच रुपयांच्याच ! मुलजिम-अभियुक्तामध्ये पांढरपेशा लोक, बनियांची मुले, मुसलमान गुंड, दुकानदार, टांगेवाले, कारकूनमंडळी अशा सगळया तऱ्हेची मंडळी असायची. त्या मंडळीमधे एक अड्डेवाला असायचा. शहरातले असे जुगारीचे अड्डे प्रसिद्ध असायचे. प्रत्येक मुकदम्याविषयी बोलताना, 'ह्या केस बोलेसाहेबांच्या होटलमधला आहे,' 'अरे, ह्या तर मशहूर सुलतानखांच्या अड्डयावरचा केस,' 'अच्छा ! यह साहब सेठ बदामीलालजी हैं ! बडा धाग आदमी है ! पोलिसने यह केस चालानहि कैसे किया ? इधर केस चला रहा है, उधर अड्डा सलामत रहे ! वह बंद थोडेही होगा ! पोलिसवाले जिंदाबाद ! उस मोहेल्लेका थाना तो नम्द दस हजार साल का हैं ! (ठीक ! हे तर शेट बदामीलालजी ! फारच बेरकी माणूस हं ! पोलिसांनी हा केस चालनच कसा केला बरे ! इकडे तर केस उभा राहिला आहे, तिकडे अड्डा चालूच आहे ! तो बंद थोडाच होणार ? पोलिस जिंदाबाद ! त्या पेठेच्या पोलिसठाण्याची वर्षाची दहा हजाराची मिळकत आहे !) असल्या गोष्टी ऐकायला मिळायच्या. या चालान झालेल्या केसेस चार-सहा महिने, वर्ष-दीड वर्ष चालून निकालात निघत. कुणा अभियुक्तांना दंडाची शिक्षा होई; पण बहुतेक सगळे अभियुक्त 'निर्दोष नी पूर्णतः मुक्त' झालेले ऐकायला मिळायचे ! प्रत्येक केसमध्ये पोलिसांच्या 'दबिश'च्या-छाप्याच्या Raid-चित्तथरारक गोष्टींची सुरस वर्णने ऐकायला मिळायची. वकीललोकांची कामाची गर्दी असायची, अधिक करून एका बाजूने मिशांचे आकडे वारंवार पिळीत, बगलेत दोन फुटांची गोल गुळगुळीत दांडीवजा काठी ठेवून असलेला मुसलमान किंवा कायस्थ ठाणेदार व त्याच्या वतीने गबाळया कपडयातला बावळट प्रॉसिक्युटर-अभियोजक वकील, तर दुसऱ्या बाजूने तालेवारपणे वागत असलेले मुसलमान फौजदारी वकील आपल्या 'हालीबुहाली'-बगलबच्च्यांची फौज घेऊन फड मारीत असलेले ! कोर्टात आपल्या पक्षकारांना कस्पटाप्रमाणे लेखीत त्यांच्याकडून प्रत्येक पेशी तारखेचे दहा-वीस रुपये फी वसूल करीत, फुरसतीच्या वेळी त्याच पक्षकारांना आपले आदरणीय यजमान बनवून पक्षकारांबरोबर कोर्टातल्या होटलमधे चहा-समोसे कचोरीवर ताव मारीत बसलेले असायचे-जणू दिवसभराचे जेवण तेथेच पोटभर जेवीत असल्याच्या आविर्भावाने !

माझी ओळख सेठ छन्नूलालजींशी झाली ते त्यांच्या पहिल्या दिवाणी कामाच्या संदर्भाने. माझ्याच वयाचा अग्रवाल वाणी मनुष्य. शिकलेला मुळीच नाही. केवळ रटफ् करीत देवनागरीलिपीतली हिंदी अक्षरे वाचणे नी आपली सही तेवढी सराईतपणे झटक्यात करणे. वडिलार्जित कमाईचा त्यांचा बाजारात वाडा होता. तो सुद्धा सावकाराकडे गहाण पडलेला. त्या गहाणवट कर्जाच्या वसुलीकरिता सावकाराने कोर्टात दावा केल्यामुळे सेठ छन्नूलालजी माझ्याकडे आले. ते कुणाच्या शिफारशीवर हे मला आठवत नाही; पण त्याच संदर्भात मला सेठजींची माहिती कळली ती अशी की, सेठ छन्नूलालजींनी बापाचा हलवायाचा धंदा न करता तो गुंडाळून

काही दिवस घरे-जमिनीविक्रीच्या दलालीचा धंदा केला; पण तो अंगाशी आला होता. सध्या म्हणजे माझ्याकडे प्रथम आले त्या दिवसात सेठजी स्वतःच्या वाड्यात बापाच्या रस्त्यालगतच्या हलवायाच्या दुकानाच्या दालनातच सायकल-रिपेअरिंगचे दुकान चालवीत होते. सेठजी माझ्याकडे यायचे ते सायकलवर बसूनच. रस्त्यामधून अती वेगाने सायकल चालविणारे म्हणून त्यांची ओळख कित्येकांनी मला सांगितली होती व सायकलीच्या कामात फार जाणकार मनुष्य म्हणून मलाही थोड्याच दिवसांत अनुभवही आला. मनुष्य वृत्तीचा दिलदार, कुणाही वाण्याची चिक्कूवृत्ती मुळीच नाही. उलट कपड्यालत्त्यात, खाण्यापिण्याच्या आवडीत, सढळ हाताचा नी चविष्ट तोंडाचा प्राणी! कानात नेहमी सीझनप्रमाणे हीना नाही तर खस अत्तराचा 'फाया', हातात दोन-तीन सोन्याच्या नी रंगीत खड्यांच्या आंगठ्यांपासून ते ऋतुकालमानाने अंगावर चांगल्यापैकी कपडे असावयाचे. थंडीच्या दिवसात स्वारी पायात मोजे पंपशू, कमरेवर तलम स्वच्छ धोतर, त्यावर गुडघ्यापर्यंत खाली पोचणारा फ्लॅनेलचा कुडता, त्यावर लोकरीचा स्वेटर, त्यावर उघड्या गळ्याकॉलरीचा गरम कोट, गळ्याशी मऊशार लोकरीची रुंद मफलर नी खांद्यावर चांगल्यापैकी शाल पांघरलेली! वेळप्रसंगाने वकील-साहेबांच्या घरी येताना त्या ऋतूतली चांगल्यापैकी मिठाई नेमाने घेऊन यायचे. लक्ष्मीपूजनाच्या प्रसादाचे थाळ चांगल्यापैकी चार-पाच प्रकारच्या मिठायांनी भरलेले, त्यावर जरीचा किनखापी रुमाल घालून आणायचे, तर संक्रांतीच्या दिवसात रंगीबेरंगी पाकात पाकविलेल्या चिरोंजी दाण्यांनी आणि तिळाच्या 'खस्ता करारी गजक'ने भरलेले ताट त्यावर क्रोशाचा जाळीदार रुमाल घालून आणायचे; पण ही सगळी पुढली हकीगत. वकीलसाहेबांशी चांगली जानपहचान झाल्यावरची! सुरुवातीस गहाणवटाच्या दाव्याचे काम देताना सेठजींनी मला स्वच्छपणे सांगून टाकले होते की, 'वकील-साहेब! मला कर्ज फेडायचे आहे–पै अन् पै फेडायचे आहे; पण माझ्या सवडीने! घर नीलाम होण्याची वेळ शक्य तितक्या दिवस टाळता येईल तशी टाळायची, हे लक्षात ठेवून काम चालवा!' मधूनमधून सेठजींनी कर्जाच्या देण्यापायी कोर्टात दोन-चारशे रुपये जमा करवावेतही. चेहऱ्यावर ओढगस्तीचे मुळीच नाव नाही. चेहरा नेहमी कसा दूधतुपाचे जेवण जेवीत असल्यासारखा, सोन्या-चांदीच्या वस्तू हाताळणाऱ्या सराफासारखा नेहमी तजेलदार! सेठजींच्या चेहेऱ्यावर सकाळी, दुपारी, नेहमी झोपाळू भाव; पण संध्याकाळच्या वेळेस मात्र चेहेरा उत्साहाने ओसंडून जात असलेला! सुरुवातीच्या दिवसांत मला ते सगळे विलक्षण वाटायचे. कमाईच्या नावाने बघावे तर सायकलरिपेअरिंगचे दुकान करणारा; परंतु वृत्तीने, व्यवहाराने बघावे तर सराफाच्या दिमाखात वावरणारा! पुढल्या महिन्यात कर्जापोटी काही जास्त रक्कम जमा करायला हवी असे बजावले, तर सेठजींनी अजीजीची भाषा न बोलता पैसे भरण्याची तोंडभरून विश्वासाने खात्री द्यावी नी थोड्या-फार उशिराने का होईना, चारशे-पाचशे रुपये आणून कोर्टात भरावेतही. मधूनमधून सेठजींनी म्हणावे, 'घरमें कच्चा साथ है, बडी बिटिया जवान-स्यानी-हो रही है, सगाई का मौका ढूंढ रहा हूँ, उसी कामसे आग्रे गया था. आतेवक्त आपके लिये आग्रे का बढिया पेढा दालमोट लेआया हूँ!' ('घरात अजाण मुलांची जबाबदारी आहे, मोठी मुलगी वयात आली आहे. लग्न ठरविण्याच्या प्रयत्नात आहे. त्याचकरिता आग्र्याला गेलो होतो. येताना आपल्यासाठी आग्र्याचा चांगल्यापैकी पेढा व दालमोट घेऊन आलो.') लग्नाचे पक्के का करीत नाही?, म्हणून विचारले तर सेठजींनी म्हणावे, 'वकीलसाहाब, हमारी कौम बडी बेहया है! लडका कैसा भी हो, दहेज बीस हजार से कम लेने का नाम नही! आदमी जरा खातापीता हो, तो और उँची हाँकता है. बिटिया हुशियार है, पढती है. ऐसी वैसी जगहमें सगाई करने को जी नहीं चाहता. ऐसे वैसे बनिये के घरमें बिटियोंका कबाडा हो जाएगा! (वकीलसाहेब, आमची जात फार उलट्या काळजाची आहे! मुलगा कसा का असेना! हुंडा वीस हजारांहून कमी घेण्याचे नाव नको! मनुष्य घरचा खाऊनपिऊन सुखी असला तर आणखीच मोठ्या रकमेची मागणी करतो. मुली हुशार आहेत. शिकत आहेत. कुठल्या तरी स्थळाशी विवाहसंबंध निश्चित कर-ण्याला मन तयार होत नाही. अशा तशा वाणी माणसांच्या घरात मुली पिचून जातील!) सेठजींच्या मुखाने मुलीच्या बापाचे हृदय बोलताना ऐकून मी चमकलो होतो. तरी सायकलरिपेअरीचे दुकान चालविणाऱ्या बनियाचे महोदार मन बघून मनामधे कुठे तरी पाल चुकचुकत होतीच!

एके दिवशी अचानक उलगडा व्हावयाला सुरुवात झाली. सेठजी एके संध्याकाळी थोड्याशा शरमिंद्या चेहेऱ्यानेच माझ्या कचेरीत आले नी त्यांनी खाली बसायच्या आधीच मला विचारले की, 'वकीलसाब, आप फौजदारी केस भी तो लढोगे न? आपकेपास उसी मतलबसे आया हूँ!' सेठजींनी माझी मूकसंमती गृहीत धरली. मला ते जे काम करायला सांगणार होते ते असे होते, त्यांनी स्वतःच्या घरामध्ये जुगारी अड्डा चालविल्याबद्दल, त्यांच्यावर व इतर सहा-सात लोकांवर फौजदारी कोर्टात पोलिसने दाखल केलेल्या मुकदम्यामधे त्यांच्या व इतर अभियुक्तांच्या वतीने काम पाहणे. मी त्यांच्या प्रश्नाला काय उत्तर द्यावे याचा विचार करीत आहे असे पाहताच, सेठजींनी मला विश्वासून सांगितले की, घाबरण्याचे कारण नाही. त्यांनी सर्व बंदोबस्त केला आहे. मला तर कोर्टात तारखेवर केवळ उभेच राहावयाचे आहे. कोणी साक्षीदार येणार नाहीत, आले तर त्यांच्याविरुद्ध बोलणार नाहीत. एखाददुसऱ्या साक्षीदाराची कसून उलटतपासणी करावी लागेल इतकेच. मुद्दे-मालाच्या नावाने आठ अभियुक्त मिळून एकूण पंधरा रुपये आठ आणे इतकीच रक्कम पोलिसांनी जप्त केली आहे. चालान दाखल करणारे ठाणेदार जरा नवेच आहेत. नुकतेच सेठजींचा वाडा ज्या मोहल्ल्यात आहे त्या मोहल्ल्याच्या ठाण्यावर बदलून आले आहेत. तेही हळूहळू ठिकाणावर येतील! 'आप इन्कार न करो, सिर्फ खडे हो जाइये, मैं सब ठीक कर दूँगा. आपको अपेश न लगने दूंगा!' (तुम्ही नाही म्हणू नका, नुसते उभे राहा! मी सर्व व्यवस्था करीन. तुम्हाला अपयश लागू देणार नाही!) मला त्यांच्या बोलण्याची गंमतच वाटत होती. फौजदारी कामाचा अनुभवही घ्यायचा होता. म्हणून मी काम करायचे मान्य केले.

केस कोर्टात उभी राहिल्यावर मला अनुभवही वेगळा आला नाही. दोन–चार तारखा अशाच साक्षीदार हजर नाहीत असे कारण लिहून

वाढल्या. नंतर दोन पच साक्षीदार आले. त्यांची त्या दिवशी साक्ष झाली. एकाने सांगितले की तो भाड्याने घेतलेली सायकल परत करायला म्हणून सेठजींच्या दुकानासमोर उभा होता. दुसऱ्याने सांगितले की सायकलचे पंक्चरदुरुस्तीचे काम पोरे करीत होती म्हणून तो दुकानात बेंचवर बसला होता. त्या दोघांना पोलिसने धमकावून जबरदस्तीने पोलिसांनी लिहिलेल्या पंचनाम्यावर साक्षीदार म्हणून सह्या करायला भाग पाडले होते. त्या दोघांनाही प्रत्यक्ष काय व कुठे घडले याची काही माहिती नव्हती. पत्ते खेळण्याबद्दल साक्षीदार म्हणून जो मुलगा आला त्याने पोलिसांच्या माराच्या भीतीने साक्ष दिल्याचे सगळे नाटक करून दाखविले. अगदी अंगावर उठलेले वळ दाखवीत नी काळ्या–निळ्या जागेवर अंगाला बोट लावायला मी पुढे बोट करताच जोराने किंचाळत ओरडण्यापर्यंत ! त्याचे म्हणणे; तो व त्याचे एक दोन मित्र सेठजींच्या मुलाबरोबर शाळेत शिकले होते. संध्याकाळच्या वेळी माडीवर लॅंडिसचा डाव मांडून पत्ते खेळत होते. तर तेथे येऊन पोलिसांनी त्याला पकडले. त्याचे मित्र खिडकीतून उड्या मारून शेजाऱ्याच्या गच्चीवर पळून गेले ! मला पकडून नेल्यावर पोलिसठाण्यात मला रोज मारीत होते. मी पैसे लावून पत्ते खेळलो हे धादांत खोटे ! माराच्या भीतीने तो साक्ष द्यायला कबूल झाला तेव्हा मारपीट थांबली ! नालेचा म्हणून कोर्टाच्यासमोर आलेला डबा सेठजींच्या विड्यांची थोटके टाकण्याचा डबा आहे. त्या उब्यातले तळाचे जळके डागही त्याने कोर्टाला दाखविले. पोलिसपार्टीबरोबर छापा घालावयाला निघण्यापूर्वी बोलावलेले व तेथून पोलिसपार्टीबरोबर 'दविश'साठी–छापा घालण्यासाठी सेठजींच्या घरी आलेले दोन पंच साक्षीदार, त्यापूर्वी कमीत कमी पाच प्रकरणात पोलिसांच्या वतीने पंच म्हणून साक्ष द्यावयाला कोर्टात येऊन गेलेले 'मामूली आसामी होते–' बाहैसियत साहिबेजायदाद ' आदमी नव्हते. आमच्या हायकोर्टाच्या एका माननीय न्यायमूर्तींच्या शब्दात 'चवन्नी के गवाह ' होते. त्या दिवसांत तेथे सामान्य साक्षीदारांना चार आणे भत्ता मिळत असे व त्यावरही साक्षीदार खूष असत. कारण त्या दिवसांत तेथे एका रुपयाला १८–१९ शेर गहू उघड्या बाजारात मिळत असे !

नवे ठाणेदारसाहेबही कोर्टात साक्ष द्यायला आले. त्यांनी सांगितले– अगदी ठासयात सांगितले की, सेठजी नेहमी जुगार खेळण्याचा अड्डा चालवितात. रात्रभर त्यांच्या घरी धुडगूस चालतो. मोहल्लेवाल्यांच्या तक्रारी आल्या होत्या वगैरे...पण रोजनामच्यामधली डेली केस डायरीमधली एकही नोंद तक्रारीबद्दलची त्यांना दाखविता आली नाही, की कोणी 'मोहल्लेवाला' साक्षीला कोर्टात आला नव्हता. 'रात्रभर धुडगुसाच्या' पुराव्याचे बिंग बाहेर काढताना त्याच आळीला सेठजींच्या वाड्याजवळ तीन गायिका नायकिणींच्या माड्या होत्या हे ठाणेदारमहाशयांना कबूल करावे लागलेच होते. ठाणेदारसाहेबांनी अजीजी करून कोर्टाकडून एक मोहल्लेवाला साक्षीदार साक्षीला बोलावण्याची कोर्टाला विनंती केली व आणखी एक तारीख घेतली; पण त्या तारखेवर एक चुणीदार पायजमा, कशिदा काढलेला कुडता व तसल्याच कशिदा काढलेल्या मलमलीची डोक्यावर लखनौकडली टोपी व अंगात कुडत्यावर एक जुनाट रेशमी जाकीट अशा वेषात आला. त्याने नाव, बापाचे नाव वगैरे सांगितल्यावर धंदा काय म्हणून विचारताच आढ्यतेच्या स्वरात व मुद्रेने साक्षीदाराने सांगितले की, 'मैं साजिंदा हूँ-मुझे मिठ्ठू उस्ताद कहते हैं ' साक्षीमधे साक्षीदाराने सांगितले की सेठजींचे सायकलीचे दुकान रात्री सुद्धा अकराबारा वाजेपर्यंत उघडे असते, 'मुझे जुवे के अड्डे वगैरा के बारे में कुछ मालूम नहीं. मुझे इन बातों के लिये फुरसतहि नहीं मिलती. मैं तबलेका सुर मिलाना छोडकर इन जुवों के अड्डों को क्यूँ तलाशता फिरूँ ? अल्लाह परवरदिगार का शुक्र है व रहे, मुझे अपनेहि पेशेमें भरपेट रोजी मिल जाती है. पूरा मोहल्ला मुझे जानता है, ये ठानेदारसाहब भी तो...' कोर्टाने रागेल्या स्वरात साक्षीदाराला धमकावीत म्हटले, 'बकवास बंद करोजी. जितना सवाल उतनाहि जवाब दो ! अपनी जबानी उस्तादी यहाँ मत बजावो !' ('मला जुगारीच्या अड्ड्यावगैरेबद्दल काही माहीत नाही. मला रिकामा वेळच मिळत नाही. मी तबल्याचा सूर मिळवायचे सोडून या जुगारीच्या अड्ड्यांचा शोध घेत कशाला हिंडू ? दीनदयाळ परमेश्वराची कृपा आहे व रहावी. मला आपल्या धंद्यामधेच पोटापुरती रोजची मिळकत मिळून जाते. सगळ्या पेठेची वस्ती मला ओळखते. हे ठाणेदारसाहेबसुद्धा '...' बडबड थांबवा पाहू ! जेवढा प्रश्न आहे, तितकेच उत्तर द्या ! तुमचे तोंडाळ कसब येथे नका वाजवू !') साक्षीदाराने हिरमुसल्या तोंडाने कोर्टाला अदबीने मुजरा केला; पण ठाणेदाराने 'गवाह मुखालिफ होगया है, मैं इसका बयान नहीं करना चाहता.' (साक्षीदार फिर्यादीच्या विरुद्ध फुटला आहे. मी त्याची जबानी–कथन–करवीत नाही.) म्हणताच साक्षीदाराने हसऱ्या चेहऱ्याने कोर्टाला व ठानेदारालाहि मुजरा करून कोर्टाबाहेर तो निघून गेला.

परिणाम व्हायचा तोच झाला. फलतः 'जुव्याचा केस' पोलिसपक्षाचा पुरावा विश्वासयोग्य नाही त्यावरून मुलजिम बिरुद्ध–अभियुक्ताविरुद्ध कोणताही जुर्म-अपराध सिद्ध होत नाही. असा निष्कर्ष निघून 'मुलजिम बाइज्जत पाक औ साफ बरी ' (अभियुक्त ससन्मान विनालांछन दोषमुक्त बन्धमुक्त) ठरविण्यात आले. पोलिसांच्या पुराव्याचा हा आविष्कार बघून मी जे काही शिकायचे ते शिकलो, जे काही समजायचे ते समजलो; पण सेठजींना जुवा खेळण्याबद्दल उपदेशाचा घोट पाजण्याचा माझा आवेश कोठच्या कोठे कसा लुप्त झाला हे मला जाणवलेच नाही !

पण सेठ छन्नूलालजींनी माझी सत्त्वपरीक्षाच घ्यायचे ठरविले होते की काय, न कळे. त्यानंतरच्या आठदहा वर्षांत सेठजींच्या विरुद्ध असे, जुगारीचा अड्डा चालविल्याबद्दल चार पाच मुकदमे–खटले कोर्टात चालान झाले नी पोलिसांच्या पुराव्याची शिवलेल्या तयार कपड्यांसारखी दिसणारी वस्त्रे, कोर्टासमोरच्या पुराव्याच्या छाननीत लक्तरे–चिंध्याच असल्याचे दिसत राहिले. दोष कपड्यांचा तितका नव्हता, जितका ती शिवणाऱ्या शिंप्याची, आपली शिलाईची मजुरी घेऊनही वरती कपड्याची चोरी करण्याच्या व्यापारी दृष्टीचा होता नी त्याबरोबरच त्याच्या बेपर्वाईचा, चुकारपणाचा व गलथानपणाचाही होता ! तरी पण सेठजींच्या पाच प्रकरणांना हाताळताना माझ्या मनातली रुखरुख वाढतच राहिली. बाररूममध्येही मी सेठजींचा खास वकील म्हणून कुचाळीचा–कुत्सित टीकेचा विषय होऊ लागल्याचेही जाणवायला लागले. त्याबद्दल मी सेठजींना एकदा बोललोही. माझे

बोलणे सेठजींनी तेव्हा उत्तर न देता हसण्यावारी नेले; पण त्यांनाही बाररूममधल्या माझ्या टीकाकारांचा समाचार घेण्याची उबळ आली असावी. कारण माझ्या त्यांना बोलण्याच्या चार-पाच दिवसांतच, सेठजींनी मी बाररूममध्ये माझ्या टीकाखोर टोळक्यांनी घेरलेला पाहून, सेठजी बाररूममध्ये नम्रतेने आले व मला व माझ्या भोवतीच्या मंडळींना 'मुजरा है हुजूर' म्हणून सेठजींनी काय केले? सेठजींनी खिशातून सोन्याचे काम केलेला लहानसा चकचकीत पॉलिश केलेला गनमेटलचा 'जूता'–दरबारी चढावाच्या नमुन्याचा काढून तप-किरीच्या डबीसारखे स्प्रिंगने उघडणारे झाकण उघडून तो 'जूता'–हाताला हात लावून प्रत्येकापुढे धरीत गेले व पाळीपाळीने प्रत्येक वेळी 'इनायत हो हुजूर' (कृपा व्हावी, मालक!) म्हणून एकेकाला त्या जूत्यामधली वेलची-बदाम-पिस्ते-पेपरमिंट मिसळलेली बारीक कातरेली सुपारी चाखवायला आरंभ केला! सेठजींनी मला वगळून इतर सर्वांना तो 'जूता' दाखविला–चाखविलाही व प्रत्येक टीका-खोराने आपल्या ओशाळ्या चेहेऱ्याची लाज सुपारीची लज्जत रसिकतेने चाखीत असल्याच्या आविर्भावाने दाखविली–लपविलीही! त्यापैकी स्वतःची खीज मिटविण्यासाठीच असेल बहुतेक, पण सेठजींना म्हटले, 'अहो! तुमच्या वकिलसाहेबांना तर द्या ही जूती सुपारी!' त्यावर सेठजींनी ताडकन उत्तर दिले, 'हमारे वकीलसाहाब की बात मत करो! उनको न इस जूती की पहिचान है, न खाने की आदत. इस जूती का मजा तो आप ही चख सकते हो!' मी सेठजींच्या 'कैसा दिया जवाब?' च्या आनंदाकडे व माझ्या टीकारांच्या ओशाळ्या चेहेऱ्यांकडे बघतच राहिलो! त्या टीकाखोर सहयोगी मंडळीमध्ये 'वही रफ्तार बेढंगी'ची आढचता माझ्यासमोर दाखवीत मला 'अछूत' म्हणणारी मंडळीही होतीच, हे काय मी सांगायला हवे?

बारमधल्या काही सहयोगी मंडळींच्या कुत्सितपणाचे असे परस्पर उत्तर दिले जाऊनही, माझ्या मनातली रुखरुख मिटली नव्हती. एके दिवशी मी सेठ छन्नूलालजींच्या गळी पडल्यागत, त्यांच्या जुगारीच्या व्यवसायावद्दल विषय काढून त्यांच्या व्यवसायाचे तत्त्वज्ञान समजून घेण्याचा–सेठजींच्या अंतःप्रेरणेचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. समाजाची धारणा योग्य दिशेने करू पाहणारे सगळे काही वाद-पुराणमतवादी नी पुरोगामीही–गुंडाळून ठेवणारे सेठजींचे तत्त्वज्ञान अगदी साधे-सरळ होते. सेठजींची अंतःप्रेरणा नितांत मानवीच काय पण अव्याज–नैसर्गिक होती! त्यांच्या भोवतीच्या परिस्थितीत अनिवार्य होती! सेठजींचे म्हणणे 'जुगार कोठे चालत नाही? राजघराण्यातील किंवा खानदानी मंडळी सदस्य असणाऱ्या क्लबां-पासून तो शहरातल्या नोकरपेशा व तरुणमंडळींच्या क्लबांपर्यंत सगळ्या ठिकाणी पत्त्यांच्या टेबलावर बसून केवळ पत्ते खेळले जात नसून राजरोसपणे पैसे लावून पत्त्यांचा जुगारच चालतो. मग त्या खेळांना 'कॉंट्रॅक्ट ब्रिज' नाव द्या की 'रमी'चा खेळ म्हणा, की तीन पत्त्यांचा फ्लॅशचा खेळ म्हणा! घोडदौडीच्या मैदनावर घोड्यांच्या पळण्यावर शर्यती नावाने पैसे लावून पहिल्या-दुसऱ्या टोटचे किंवा / जॅकपॉटचे पैसे शेकड्यांनी. हजारांनी मिळविणे हाही जुगार शिष्ट-संमतच नव्हे तर राजसंमत जुगारच आहे. आकाशातल्या ढगाकडे पाहून 'धडा' लावणारे धडेबाज काय, तथाकथित चांदीच्या पेटचांचे वायद्याचे सौदे करून तेजीमंदीचा सौदा करणारे सराफ काय, नी अळशी, एरंडी, बिनोले, तीळ आदि गळिताची धान्ये, तथ्यार्थ पांढर-पेशा लोकांच्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या क्रयविक्रयात कृत्रिम मागणी-पुरवठ्याच्या तेजीमंदीचे अर्थकारण खेळणारे थोक व्यापारी वा खुदर-चिल्लर-दुकानदार काय, जुगार नाही तर आणखी काय करतात? लोकशाहीच्या नागरिकांच्या संविधानी मतस्वातंत्र्याचा, फुंडगुंडपणावर चालणाऱ्या राजकारणी, समाजसेवाधोरणी, धर्म-नीतीच्या पुराणिकांच्या पक्षांकडून मते गोळा करण्याच्या नावाने देश-धुरीणांकडून जे काही राजकारण, समाजकारण खेळले जाते ते सारे फसवाफसवीवर व स्वार्थपूर्तीवर आधारलेले असते. सत्ताधीशांच्या विलासीपणाचे चोचले पुरवून घेण्यासाठी चंद्याची लाखोंनी लूट करणारे व त्या लुटीचा विनियोग जनहितापेक्षा स्वहिताकडे करणारे शासक पदाधिकारी, मग ते विष्णुपदाचा वारसा सांगणारे राजे-महाराजे असोत किंवा समाजवादाचा नी पुरोगामित्वाचा टिळा मिरविणारे तुमच्याआमच्यापैकीच असोत, सगळेजण सत्तासिंहा-सनावर अधिष्ठित होताच 'खोपडी उलटी' झालेले मत्त-प्रमत्त-उन्मत्तच असतात, नी त्यांच्याच मानवबंधुभगिनींच्या कमाईचे अपहरण करीत असतात!'

'स्वतंत्र व्यवसाय, व्यापार करायला जावे तर तेथे सुद्धा भयंकर जातपात आहे! जैनी ओस्वाल बनिये, अग्रवाल गहोई बनिये, मारवाडी नारनोली बनिये, सगळे आपापल्या जातीपुरते भले पाहतात. त्यांच्या धंद्यामध्ये दुसऱ्या कोणाला शिरू देत नाहीत. साधे हलवायाचे दुकान करायला जावे तर कोणाकोणाची जात सांभाळावी? बाजारात साखरेचे नारनोली व्यापारी आपली जात बघतात. मैद्याचे जैनी गुजराती व्यापारी आपली जात बघतात. तेलाचे गहोई, मुसलमान बोहोरी व्यापारी आपली कौम बघतात. दुधातुपाचे ठाकुरगवळी लोक आपली बिरादरी बघतात. दुकानवाला घरमालक आपला माणूस बघतो. चांगली मिठाई बनविणारे सनाढच ब्राह्मण नोकर आपल्या जातवाल्याकडे धाव घेऊ बघतात. जातीच्या बाहेर जाऊन काम करणाऱ्याला धंद्यात मुळीच पत नसते. एक दिवसाची उधारी मिळणे कठीण होते. सायकलचे दुकान चालवीन म्हटले तर कंपनीची एजन्सी देणारे कंपनीचे नोकर-लोक गावात आले म्हणजे त्यांची कोण बडदास्त ठेवावी लागते! निवासभोजनाच्या व्यवस्थेशिवाय त्यांच्या पिण्यानिजण्याचेही चोचले पुरवावे लागतात! तुम्हाला माहीत नसेल; पण तो बाजारातला सगळ्यात मोठा रंगाचा सोलएजंट व्यापारी आहे ना! त्याने कायमच्या दोन नायकिणींच्या मुली महिनेवारी पगार देऊन नोकरच ठेवल्या आहेत–येणाऱ्या विक्रीप्रतिनिधींची बडदास्त ठेवण्याकरिता!'

'मला दोन वयात येऊ पाहणाऱ्या मुली आहेत. मी कशा ही व्यापारी तंत्रे सांभाळू? आणि जुवा-जुगार खेळण्या-खेळविण्याबद्दल विचाराल तर क्लबातून डॉक्टरलोकांच्या घरी, वकीलमंडळींच्या घरी, बनियेलोकांच्या घरी, बड्याबड्या सरकारी अधिकाऱ्यांच्या घरी, वर्षभर जुगाराचे अड्डे जमलेले असतात. बड्याबड्या धनिक लोकांची तरुण मुले या अड्ड्यांतून हिरीरीने जुगार खेळतात. ही मुले अशा जुगारात कधीच जिंकत नाहीत. त्यांच्या पैशांनी कुणी तरी दुसराच पैशाचा धन करीत असतो–बहुधा सरकारी अधिकारीच अधिक. कधीकधी डॉक्टर, वकील, राजकीय नेताही जिंकतात.

नी सगळीजणं त्या धनिक वणिक बाळांचा मुक्त कंठाने खिलाडी-स्पोर्ट म्हणून डंका वाजवीत असतात ! हा पैशाचा खेळ सगळीकडे राजरोसपणे चालत असतो. तो सगळा जुगारच आहे. नावे मात्र निरनिराळी ! अमका खेळ, तमका व्यापार अशी ! नागरिक म्हणून बोलायचे तर मुसलमान ठाणेदार मुसलमान गुंडांना संरक्षण देतो, कायस्थ ठाणेदार कब्जी लुच्च्यांना सांभाळून घेत असतो, कनोजिया कावळा कावेबाजपणे आपल्या जातभाईंना मदत करीत असतो. सगळे मिळून 'परकीयाला' म्हणजे नेकीने व स्पष्टपणे वागण्या-बोलणाऱ्याला पाडण्याचे धोरण ठेवून वागत असतात. त्यांच्या व्यावसायिक जातीत शिरू देत नाहीत नी आपल्या स्वतःच्या कमाई-वर लक्ष ठेवून असतात. आपणाला माहीत आहे ? पोलीस विभागात कोणाकोणाला हप्ते द्यावे लागतात ते ? रेल्वेच्या कंत्राटात काय, सरहद्दीबाहेर मालाची निकासी-पाठवणी- करणारे काय- दारूचे गुत्ते चालविणारे काय, शासकीय कंत्राटाचे ठेकेदार काय, सर्वांना आपापल्या विभागातल्या अधिकाऱ्यांना नियमितपणे हप्ते द्यावेत तेव्हा कोठे आपल्या धंद्याची गाडी सुरळीत चालविता येते ! माझेच पहा ना ! मोहोल्ल्यातल्या पोलिसठाण्यामध्ये, शिपायी-दिवाणजी-दरोगा तर आहेतच; पण त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुद्धा त्यांचा 'हक' बिनतक्रार पोचवावा लागतो. तुम्ही हप्ते देण्याचे बंद करा; तुम्हाला मोहोल्ल्यात राहणे मुश्किल करून सोडतील ! आमच्या मोहोल्ल्यात जो नवा ठाणेदार आला आहे ना ? त्याचा माझा सूर मिळत नाही. तो आहे कनोजा. त्याला कुणा बनियाकडून हप्ते घेणे धोक्याचे वाटते. यासाठी तो मला त्रास देत आहे. अहो ! परवा माझ्याकडे सगाईची बातचीत करण्यासाठी धोलपूरचे ते सेठजी आले, तर नेमक्या त्याच वेळी या लेका ठाणेदाराने माझ्याकडे हप्ता मागा-यला शिपाई पाठविला ! आता सांगा हप्ता वेळच्या वेळी देऊ नको तर काय करू ? पैसा कसा घरात येईल ? मी काही कुणाला बोला-वणे धाडीत नाही की माझ्याकडे जुगार खेळायला या म्हणून ! तुम्हाला एकमेकांशी जुगार खेळायचा तो माझ्या घरी खेळा ! माझी नालं अगोदर द्या म्हणजे झाले, नी खेळा जुवा हवा तितका ! तुम्हाला पुलिसांचा त्रास होऊ नये ही जबाबदारी माझी ! मी काही दुकानदारी केली. खवा विकायचे दुकान चालविले, वडिलांच्या वेळेपासूनच ते खवेवाले खवा द्यायला दुकानावर येत असत. माझ्याने हलवायाची कारागिरी जमली नाही म्हणून नुसता खवा विकीन म्हटले; पण हे खवेवाले मला गाईम्हशींच्या खव्यात बकरीच्या, उंटिणीच्या दुधाचाच खवा मिसळून द्यायला लागले ! मला काय कळत नाही कुणाचा कशाचा खवा आहे म्हणून ? तेवढ्यापुरता मी खान-दानी हलवायाचा बच्चा आहे की ! तसाच खवा विकीन म्हटले तर दर आठवड्याला म्युनिसिपालिटीच्या फूडइन्स्पेक्टरला खव्याची एक थप्पी पोचवावी लागे ! उजागरीने, इमानदारीने दुकान कसे चालवू ? सायकलचे दुकान चालवितो तर पोलिसवालेच चोरीच्या सायकली आणतात नी मला त्यांच्या चाक, हॅण्डल मडगार्डची अदलाबदल करायला भाग पाडतात. मजुरीचे नाव नाही ! मी तक्रार केली तर या ठाणेदाराने मला हिस्टरीशीटर बनविले आहे. आतापर्यंत प्रत्येक खटल्यात जरी दोषमुक्त झालो तरी हिस्टरीशीट कॅन्सिल करीत नाहीत. रात्री, वेळी-अवेळी माझ्या घरासमोर आवाज लावायला पुकारा करायला आता सुरुवात केली आहे. मोहोल्लाभर आता माझ्या नावाचा माझ्याच एकट्याचा डंका वाजतो आहे. बाकी सगळे साव बनून आपापला धंदा दणक्यात करीत आहेत. तुम्ही काही कानून सांगा नी माझ्या घरावरचे हे वेळी-अवेळी आवाज लावणे बंद करवा ना ? ( येथेच मी सेठजींच्या या दुखण्याबद्दल-इन्ज्युरी Injury बद्दल विभागीय आरक्षी अधिकाऱ्यांना नोटिस पाठवून आपत्ति केली व आपत्तीचे निराकरण करण्याबद्दल मागणी केली. कारण कायद्याने एकदा तरी दोष सिद्ध झाल्याखेरीज हिस्टरीशीट सुरू करणे अवैध होते. तरी पण विभागीय प्रमुखाकडून उत्तर आलेच नाही. म्हणून हायकोर्टात रिटचा पिटिशन दाखल केला तर विभागीय प्रमुखाने शपथेवर उत्तर दिले की पोलिसठाण्याकडून अर्जदाराच्या घरावर वेळी-अवेळी पुकारा केला जातो ही गोष्ट खोटी आहे. खरे केवळ एवढेच आहे की, सेठजींचे वागणे संशयास्पद म्हणून सेठजींच्या घरावर गुपचुप पाळत ठेवली जाते. गुपचुप पाळत ठेवण्याची पोलिसांची क्रिया हा तथ्यविषयक प्रश्न आहे व त्यासंबंधाने रिटचा अर्ज करून असामान्य सहायता एक्स्ट्रॉऑर्डिनरी रेमिडी-मागणे वैध नाही. याच मुद्द्यावर पुढे रिटचा पिटिशन नामंजूर झाला ही वेगळी बाब. ) पोलिसांचे हप्ते पुरवू नको तर, एक न एक तोहोमत गळयात पडते. सुखाने, उजागरीने कोणी धंदा करू देत नाहीत. प्रत्येक मुलीमागे वीस हजारांचा दहेज देण्यापासून कोणी माझी सुटका करीत नाहीत; मला पैसा मिळविला पाहिजे. नाही तर पोटच्या गोळ्यांना बरबाद करण्याच्या पापाचा धनी व्हायचे. त्यापेक्षा मी स्वतःच पापी ठरलो तरी चालेल ! पोरींना भिकेला लावणार नाही ! दहेजची मागणी पुरी करून त्यांना चांगल्या घरी पाठवीन !' सेठ छन्नूलालजींचा गळा भरून आला होता. डोळ्यांत पाणी तरळले होते ! आपल्या वकील-साहेबांना हात जोडून ते म्हणत होते- 'वकीलसाहाब ! मुझको दो-तीन सालके लिये और निभा लो ! मैं सब इन्तजाम पूरा कर लूंगा और पार लग जाऊँगा, इस थानेदार बच्चेको ठिकाने लगा दूंगा. उपरवाले साहब मेरे मिलनेवाले हैं, मुझे आपने निभाया नहीं तो किया कराया खेल सारा चौपट हो जायेगा ! मुझे जहर खाकरही छुटकारा लेना पडेगा. मेरी लाज आपही रखो ! आपको नोचने वालों की परवाह न करो. वह मेरे ग्राहक ही है. मेरे मारफत विला-यती शराबकी बोतल मंगवाते हैं, क्यूँ कि उनको विलायती शराब की दूकान पर खुद जानेमें शरम लगती है, मैंभी शराब की बोतल के दाममें एक के दो वसूल कर लेता हूं. चुपचाप देते हैं ! किसका और क्या बताऊँ ? आप अपने कानों को गंदी बातोंसे बचाओ ! आपके दर्शनसे मुझे भगवान के दर्शन का आनंद मिलता है। आप इन्सान हो- इन्सान की पहचान रख सकते हो. बेहया नहीं हो ! भगवान आपको मेरी सारी उमर दे दें !' असे म्हणत सेठजींनी माझे पाय धरण्यासाठीच हात पुढे केलेले बघून मी आपले पाय चट्कन मागे घेतले व तारखेवर त्यांचे काम करण्याचे त्यांना आश्वासन दिले !

तरी पण मधूनमधून मी सेठ छन्नूलालजींना आठवण देतच राहिलो-अगदी एकच प्यालयातला सुधाकराला 'सुधाकर ! तुम्ही दारू सोडा !' असे सांगण्यासारखेच ! पण त्या पहिला माणूस-दुसरा माणूसच्या थाटाने नाही. कधी तळीरामाच्या गीतेच्या परखड शब्दांत तर कधी सिंधूच्या तळमळीने-गीतेचे परखड शब्द

सुधाकरच्या कानांवर पडू नयेत ही काळजी घेणाऱ्या सिंधूच्या तळमळीने!

सेठ छन्नूलालजींचे तत्त्वज्ञान निर्दोष नव्हते हे मी स्वतःच कबूल करतो. ते आता सराईत गुन्हेगाराची छद्मी भाषा म्हणून किंवा पुरोगामी व्याख्यान-मंचावरून नेहेमी बोलली जाणारी आक्रस्ताळी भाषा म्हणून हेटाळली जाणे शक्य आहे हे मलाही कळते; पण मला वकिलाला त्या वेळी 'बी' कवींच्या कवितेतला 'प्राण ज्यांचेवर गुंतले सदाचे। कोड किंचत पुरवितां न ये त्यांचे। तदा बापाचे हृदय कसे होई। काय वर्णू ? अनुभवी जाणती ते ॥' असे म्हणणारा 'मुलीचा बाप' आठवला होता! आणि 'हाच मुलाचा बाप' यातल्या दिगंबरपंतासारखे तळमळून म्हणावेसे वाटत राहिले की, समाज-सुधारकांनो! ही हुंड्याची चाल तरी मोडा! नाही तर, अकाल-मुंडित तरुणींचा तांडा पाहून आनंदाने नाचू तरी लागा!'

मी दिगंबरपंत नव्हतो, एक वकील होतो. माझी ऊर्मी एवढीच होती. की, भरमसाट 'दहेज'-हुंड्याच्या मागण्या पुऱ्या करून आपल्या पोटच्या पोरींना भल्या घरची सगाई पाहून देण्यासाठी तडफडत असलेल्या बापाचे न्यायालयातून 'जुगारी' म्हणून मुंडन होऊ नये व अपराध करूनही सेठजींनी निरपराधत्वाची शुचिता गमवू नये यासाठी होईल तितक्या रीतीने व शक्य तेवढे त्यांचे रक्षण करायचे. ते करण्यात मी माझी सगळी वकिलीची विद्या व पतही इरेस घातली; परंतु त्याबरोबरच सेठजींचे मन या 'आपलेच हात भाजून काढणाऱ्या व्यवसाया' पासून परावृत्त करण्याचा प्रयत्नही करीत राहिलो. त्यानंतरही तीन चार प्रकरणात सेठजींना 'पाकव साफ बरी'-निर्दोषतः व पूर्णतः आरोपांपासून सोडवीत राहिलो व त्याचे श्रेय विनाकारणच मला मिळत राहिले. सेठजींचे सगाई शोधणे जोरात चालूच होते; पण माझ्या की सेठजींच्या नशिबाने चार पाच घटना एकामागून दुसरी अशा त्वरेने घडत गेल्या.

– सेठजींच्या विरुद्ध पुन्हा उभ्या राहिलेल्या एका जुगारीचा अड्डा चालविण्याच्या प्रकरणात सेठजींना दोन्ही दंडांना मुसक्या बांधून सराफाच्या रस्त्यावरून मिरवीत नव्या ठाणेदाराने ठाण्यात आणले होते व ठाण्यातल्या बंदिस्त जागी सेठजी येताच त्यांच्या मुस्कटात भडकाविली होती व त्यांना आईबहिणीवरून गालिप्रदान केले होते व त्यानंतर जमानत घेऊन व जातमुचलक्यावर मोकळे सोडले होते.


– सेठजींच्या मोठ्या मुलीची सगाई पक्की होऊन ती कानपूरकडे चांगल्या घरी पडली होती व आनंदात होती.

– सेठजींच्या वयात येऊन समज आलेल्या मुलामध्ये त्यांच्या आजोबांचा आत्माच अवतरला होता असे म्हणावयास हवे. कारण त्याने सेठजींच्या खव्याच्या अडतीची बैठक एक शोभिवंत व नामवंत मिठायांचे दुकान थाटण्यात सजविली होती व त्यांचा हलवायाचा धंदा नव्या जोमाने चालू केला होता.

– सेठजींची लहान मुलगी शाळा-कॉलेजातून लक्षणीय यश मिळवून व प्रशिक्षित शिक्षकिणीचे प्रमाणपत्र मिळवून यथाक्रम एका मुलींच्या शाळेची मुख्याध्यापिका झाली होती. आपल्या आवडीच्या व्यवसायव्रताकरिता तिने जन्मभर कुंवारी रहायचे ठरविले होते.

– सेठजींची दृष्टी वयपरत्वे अधू झाली होती व त्यांच्या हातांना कंप येऊ लागला होता तरी सेठजी जाड भिंगांचा चष्मा लावून मुलाच्या मिठाईच्या दुकानात गल्ल्यावर बसून ग्राहकांची आवभगत करण्यासाठी सतर्क व तत्परतेने बसत असत. हाडाचा दिलदार मनुष्य तो ठरला. एखादा ओळखीचा ठाणेदार दुकानासमोरून परस्पर जाताना दिसला, तर सेठजींनी त्याला हाक मारून बोलवावे नी म्हणावे, ' अजी दरोगासाहेब! ऐसी क्या नाराजी मुझ बंदे गरीब-पर! आपके बच्चेने आजही बढिया कलाकंद का थाल जमाया है. जरा मुँह तो थोडा मीठा करते जावो!' (अहो ठाणेदारसाहेब! आपल्या या गरीब दासावर एवढा कसला राग? आपल्या मुलाने आजच चांगल्यापैकी कलाकंदच्या मिठाईचे ताट थापलें आहे. त्याची थोडीशी चव घेऊन तर जा नी तोंड गोड करा!')

सेठजींना आता वकिलाची गरज उरली नव्हती; पण तरी सुद्धा त्यांच्या दुकानासमोरून तसेच परस्पर निघून जाणे मला शक्य होत नसे. माझेहि तोंड अजून गोडच राहिले आहे-सेठजींमधला 'मुलींचा बाप.' आठवून! ☐

लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य २० रुपये

# नवोदितांचे (साहित्य) संमेलन

प्रकाश बुरटे, मुंबई

'पहाट 'तर्फे १३ आणि १४ मे या दोन दिवशी नवोदितांचे एक संमेलन झाले. 'हे नवोदित साहित्याच्या व्यापारात वावरत आहेत; परंतु त्यांना बाजारात प्रथितयशाच्याइतकी किंमत येत नाही,' या विचाराने बहुतांश संमेलन व्यापलेले होते.

चांगल्या कलाकृतींना देखील साहित्याच्या बाजारात स्थान मिळेलच असे छातीठोकपणे सांगता येणार नाही. बऱ्याच वेळा साहित्यव्यवहार नावावर चालतो ही वस्तुस्थिती आहे. नवोदितांना या वास्तवाचा जास्त त्रास होणे सहाजिकही आहे. संमेलनात यासंबंधीचा आणि त्यावरील उपायासंबंधीचा एखादा ठराव मांडून हा विषय संमेलनापुरता हातावेगळा करणे आवश्यक होते. तसे झाले असते तर साहित्यविषयक समस्यांची चर्चा होऊ शकली असती. दुर्दैवाने तसे झाले नाही आणि सर्व संमेलनभर साहित्येतर गोष्टींचा धुरळा उडविला गेला.

## नवोदित म्हणजे कोण ?

या परिस्थितीचे कारण संयोजकांना 'नवोदित' या शब्दाचा अत्यंत बाळबोध आणि कोता अर्थ अभिप्रेत असण्यात आहे. ज्याचे लिखाण अजून विपुल प्रमाणावर छापले गेलेले नाही तो नवोदित हा अर्थ एकदा मनात रुजला की, व्यावसायिक प्रश्नावर लक्ष केंद्रित होणे क्रमप्राप्त ठरते. 'नवोदितांच्या समस्या' या परिसंवादात अनेकांनी 'योग्य मोबदला मिळत नाही, संपादक आमचे लिखाण वाचत नाहीत, ते आम्हाला मार्गदर्शन करीत नाहीत–' अशी अनेक रडगाणी गाइली आणि परिसंवादाच्या अध्यक्षांनीही नवोदितांच्या वरील व्याख्येच्या चौकटीबाहेर न जाता उत्तरे दिली आणि म्हणून नाइलाजाने 'आजचे मराठी साहित्य रटाळ, तेच तेपणाने भरलेले आहे, साहित्याचा बाजार झालेला आहे आणि आम्ही प्रस्थापित आमच्या खुर्च्या सहजासहजी सोडणार नाही!' अशा तऱ्हेच्या अनेक शरम वाटायला लावणाऱ्या गोष्टी ऐकून घ्याव्या लागल्या.

नव्या जाणिवा उराशी घेऊन साहित्यनिर्मिती करणारा तो नवोदित साहित्यिक असा नवोदितांचा अर्थ संयोजकांना अभिप्रेत असता तर संमेलनास वेगळे वळण लागले असते. संमेलनाचे अध्यक्ष स्वतःच्या उमेदवारीच्या काळासंबंधी बोलताना म्हणाले, 'माझा उमेदवारीचा काळ हा नाउमेदीचा होता.' ही नाउमेद स्वतःचे साहित्य छापून येत नाही अथवा त्याच्यासाठी चार दिडक्या मिळत नाहीत म्हणून नव्हती. सबंध मराठी साहित्याच्या कालबाह्य जाणिवा, त्याचा कालबाह्य वास्तवाशी असलेला संबंध आणि त्यातून निर्माण झालेले मराठी साहित्याचे कोंडलेले–कोंदाटलेले स्वरूप यामुळे श्री. दि. पु. चित्रे नाउमेद आणि उद्विग्न झाले होते. 'लिट्ल मॅगेझिन्स' अथवा 'दलित साहित्य' या चळवळी मराठी साहित्यात नव्या जाणिवा घेऊन आल्या. त्यांनी स्वतःचे लेखक, कलाकार, साहित्याचा आशय–घाट, प्रसिद्धी–माध्यमे आणि वाचक तयार केले. यापूर्वीच्या काळात पंतसाहित्यापासून फारकत घेऊन क्रांतिकारक जाणिवा घेऊन आलेले संतसाहित्य निर्माण झाले. त्याच त्याच पौराणिक कथा घेऊन त्यावर अलंकारांची केवळ कलाबुती कारागिरी करणाऱ्यांपेक्षा सर्वांना भक्तिमार्ग खुला करून ईश्वरापुढे सर्व भाविक समान आहेत ही जाणीव नवी होती. 'ऊस डोंगापरि रस नव्हे डोंगा' म्हणणारा चोखामेळा आणि 'तो शरधर गरवर रविसा पविसा क्षणात सायकसा' असे अभिमन्यूच्या शरसंधानाचे वर्णन करणारा मोरोपंत यांच्या जाणिवांत जमीनअस्मानाचा फरक होता. साहित्याचा आशय आणि घाट वेगळा होता.

समाज बदलतोय, वास्तव बदलतेय, त्याकडे पहाणारे कलाकाराचे मनदेखील वेगळ्या प्रकारे घडते आहे. त्यातून साहित्यविषयक नव्या जाणिवा तयार होत आहेत. नवोदितांच्या साहित्यसंमेलनातही जर याची दखल घेतली जात नसेल तर दुर्दैवाने म्हणावे लागेल, 'हे कसले नवोदित! हे तर साहित्याच्या राजकारणातील उद्याचे खुर्चीकारणी!' अशा नवोदित साहित्याने मराठी साहित्याची कोंडी कधीच फुटणार नाही. नव्हे, त्यांना साहित्याची कोंडी झाली असल्याची कल्पना कधी शिवणारदेखील नाही. म्हणून हे उद्याचे प्रस्थापित नव्या जाणिवांचे कोंभ दुर्लक्षिणारे ठरतील. काळ गेलेला नसतो. पुढच्या वर्षीदेखील नवोदितांची संमेलने भरतील. तेथे तरी साहित्येतर गोष्टी टाळून साहित्याचा मुळापासून विचार होईल ही आशा आहे.

□

# नवोदित लेखकांची सहकारी प्रकाशनसंस्था !

पुण्यात नुकतेच नवोदितांचे साहित्यसंमेलन पार पडले. त्या वेळी नवोदितांना प्रकाशनक्षेत्रात जाणवणाऱ्या अडचणी मांडल्या गेल्या. केवळ मराठीतच ही समस्या आहे असे नाही तर इतर भाषांतही हे एक प्रश्नचिन्ह झालेले आहे. हिंदी तर राष्ट्रभाषा. सर्व देशभर पसरलेली. अधिक प्रमाणावर वाव असलेली; परंतु तेथेही नवोदितांची कोंडी आहेच. हिंदीतील एक लेखक श्री. देवेश ठाकुर ह्यांनी ही कोंडी फोडण्यासाठी काही मार्ग सुचविला आहे. मराठीतील नवोदितांनीही त्याचा विचार करावा म्हणून श्री. ठाकुर ह्यांचे मनोगत पुढे देत आहे.

आपल्या देशात शिक्षण आणि साक्षरता ह्यांच्या विकासाबरोबर साहजिकच वृत्तपत्रे, नियतकालिके आणि प्रकाशनसंस्था ह्यांचाही विकास झाला आहे. प्रकाशनसंस्थांची प्रगती म्हणजे विकसनशील राष्ट्राच्या जिवंतपणाचे, जागरूकतेचे प्रतीकच ! परंतु मूलतः ज्ञानाशी संबंधित असलेल्या ह्या क्षेत्रावर आज काही गटांचा, धंदेवाइकांचा ताबा आहे, ही चिंतेची गोष्ट आहे. देशात सर्वच भाषातील नियतकालिके–पुस्तके ह्यांच्या संख्येत स्वातंत्र्योत्तर काळात वाढ झाली हे जितके खरे तितकेच हेही खरे की असं असून अजूनही लेखक केवळ लेखनावर आपला संसार चालवू शकत नाही. गेल्या दहा–पंधरा वर्षांत नियतकालिकात जेवढी वाढ झाली आहे त्याच्यापेक्षा किती तरी अधिक वाढ झाली आहे लेखक–संख्येत !

ह्यामुळे नवोदित लेखकांच्या प्रकाशनबाबतीतील प्रश्नात काही फरक पडलेला नाही. आज जी नियतकालिकं प्रकाशित होतात त्यांचे सामान्यतः तीन प्रकार पडतात. (१) लाखो–हजारो प्रती निघणारे–खपणारे प्रतिष्ठित लोकप्रिय नियतकालिके, जेथे लेखकांना चांगल्यापैकी मानधनही मिळू शकते. (२) मध्यमश्रेणीची नियतकालिकं-ज्यांच्या पंधरावीस हजार प्रती निघू शकतात, खपू शकतात आणि तेथे लेखकांना बऱ्यापैकी मानधन मिळू शकते. ( ३ ) अनियतकालिके काढणारे साहित्यक्षेत्रातील धडपडणारे तरुण. ते आपले पैसे आणि श्रमच ह्यात गुंतवितात असे नाही तर ह्या अनियतकालिकांचा संपादक हा नुसताच संपादक नसतो तर लेखक, प्रकाशक, कंपोझिटर, प्रूफरीडर, डिस्पॅचर अशा विविध भूमिकाही त्याला अनेक वेळा पार पाडाव्या लागतात. ही अनियकालिके प्रसंगानुसार पाचशेपासून दोन-अडीच हजारापर्यन्त प्रती काढू शकतात आणि जोपर्यन्त ह्यांच्याजवळ पैसा असतो वा ह्यांना पैसा मिळू शकतो तोवर ही चालू राहतात आणि हा ओघ थांबला की एक दिवस बंद पडतात.

नवी प्रतिभा, नवा उन्मेष, नवी दृष्टी असलेले रचनाकार प्रथम ह्याच अनियकालिकांतून प्रकाशात येतात आणि तेथूनच त्यांची मध्यमश्रेणीच्या नियतकालिकांद्वारे प्रतिष्ठित नियतकालिकांकडे वाटचाल झालेली असते. आपल्या अफाट खपाच्या विस्तृत प्रमाणावर बहुसंख्य वाचकांपुढे हे लेखक आले म्हणजे त्यांना 'पुढे' आणल्याचे श्रेय तथाकथित प्रतिष्ठित नियतकालिकं आपोआप लुटतात.

पुस्तकप्रकाशनाबाबत तर नवोदितांचे हालच हाल आहेत. जोपर्यन्त नियतकालिकांच्या माध्यमातून नवोदित चांगल्या रीतीने वाचकांपुढे येत नाही तोपर्यन्त प्रतिष्ठित प्रकाशक त्याच्या रचनेला हातही लावायला तयार होत नाहीत. नवोदिताला आपले पुस्तक प्रसिद्ध व्हावे, असे वाटत असेल तर एखाद्या प्रकाशकाला गाठून, त्याला पैसे देऊन पुस्तक प्रकाशित करावे लागते. अर्थात प्रकाशक म्हणून नाव लागते ते त्या प्रकाशनसंस्थेचेच ! ( मोठमोठे प्रकाशक असा धंदा करीत आहेत. ) काही चांगले प्रकाशक त्या लेखकाचे पैसे दोन–चार वर्षांत हप्त्याहप्त्याने परत करतातही; पण प्रामुख्याने जखमेवर मीठ चोळणारेच निघतात ! 'पैशाचं काय घेऊन बसलात. तुमचं पुस्तक इतकी वर्षं आमचं गोडाउन अडवून बसलंय त्याचं काय? एवढी घाई असेल तर उचला पुस्तकं ! ' असे म्हणणारेही भेटतात.

म्हणजे ही किती दारुण स्थिती आहे! एक नवोदित आपल्या नवोन्मेषी प्रतिभेने एक पुस्तक लिहितो, ते प्रकाशित व्हावं म्हणून पोटाला चिमटा काढून पैसे साठवितो, पुस्तक प्रकाशित झाल्यावर त्याचा फायदा प्रकाशकाच्या खिशात जाताना बघतो आणि हे सगळे असह्य होऊन एवढ्यावरच समाधान मानतो की, चला, आपण लेखक तर झालो!

नव्या लेखकांचे सोडा, जुन्या प्रतिष्ठित लेखकांची स्थिती फार चांगली आहे, असे नाही. दोन–चार कवी सोडल्यास इतरांच्या कवितांचे संग्रह छापून आणणे आजही कठीण आहे. कमी–अधिक प्रमाणात निबंध, नाटक, एकांकिकाबाबत अशीच परिस्थिती आहे. ह्यांच्या तुलनेत कथासंग्रह आणि कादंबरी–प्रकाशनाच्या अडचणी कमी आहेत एवढेच ! पण अडचणी आणि शोषण आहेच. म्हणूनच अनेक लेखक प्रकाशक झालेले दिसतात आणि दुर्दैवाची गोष्ट म्हणजे हे 'लेखक–प्रकाशक' ही नव्या लेखकांची तीच कोंडी करतात. खेरीज नियतकालिकांच्या संपादकांप्रमाणे ह्यांचेही आपले लेखक असतातच पाठ्यपुस्तक, संदर्भग्रंथासाठी त्यांची वर्णी लावली जाते ते वेगळेच. हे सारे नवोदित लेखकांच्या विरोधात जाते तेव्हा प्रश्न पडतो, नवोदितांची ही समस्या सुटणार तरी कशी ?

सद्यःस्थितीत तरी ह्यावर एकच प्रभावशाली उपाय सुचतोय तो असा : नवोदितांनी साहित्यप्रेमी संपन्न व्यक्तीच्या सहकार्याने प्रकाशनव्यवसायात पडणे ! एक अशी सहकारी प्रकाशनसंस्था काढायची की जिचे सर्व सभासद 'शेअरहोल्डर' असतील. एकीकडे एकाच वेळी ५–५, ६–६ पुस्तकांचा 'सेट' प्रकाशित करायचा आणि दुसरीकडे ह्या पुस्तकांच्या विक्रीकरिता मोठ्या प्रमाप्रमाणावर ग्राहक सभासद जमा करायचे. ह्यामुळे पुस्तकांची योग्य वेळी योग्य विक्री होऊ शकेल. ही सहकारी प्रकाशनसंस्था आपले नियतकालिकही चालवू शकेल. लेखनाच्या निवडीसाठी सर्व संमतीने निःपक्षपाती विद्वानास पाचारण करणे शक्य होऊ शकेल. अशा प्रकारे सहकारी प्रकाशनाद्वारा नव्या लेखकांच्या चांगल्या पुस्तकांची निर्मिती होऊ शकेल आणि त्याचबरोबर नवोदितांची कोंडी फुटण्यास मदत होईल. एवढेच नव्हे तर त्यांस काही मानधनही मिळू शकेल.

—अनिल वसंत बळेल, पुणे

## पुस्तके

# वेडगळ

### सिद्धहस्त लेखणीचा थोडाफार प्रत्यय

वेडगळ ही जयवंत दळवींची आणखी एक नवी कादंबरी. दळवी एक सिद्धहस्त लेखक आहेत. कोकणच्या ग्रामीण, तसेच मुंबईच्या शहरी जीवनावर आधारभूत अशा अनेक कादंबऱ्या त्यांनी यशस्वीपणे लिहिल्या आहेत. त्यांची 'वेडगळ' ही नवी कादंबरी पण त्यांच्या सिद्धहस्त लेखणीचा पुन्हा एकदा बराचसा प्रत्यय आणून देते.

दळवींच्या इतर अनेक कथा–कादंबऱ्यांप्रमाणेच 'वेडगळ'ची पार्श्वभूमीही कोकणच्याच कुठल्या तरी भागाची आहे; पण अशी ग्रामीण पार्श्वभूमी असून देखील ती कादंबरी त्या वातावरणापासून अलिप्तच राहताना दिसते. किंबहुना दळवी कोकणच्या वातावरणनिर्मितीपेक्षा त्यातल्या व्यक्ती, त्यांच्यातले संबंध आणि घडणारे प्रसंग ह्यावरच अधिक भर देताना दिसतात. त्यामुळेच त्यातली प्रादेशिकता काहीशी मागे पडत जाते आणि परिणामी त्या व्यक्ती आणि ते प्रसंग कोणत्याही प्रादेशिक परिस्थितीत नेटकेपणी नेऊन ठेवता येतात.

एका गावामध्ये विशेषत: तिथल्या काही व्यक्तींमधून ही कथा आकारते. कथानकाच्या घडणीबरोबरच तो गाव मागे पडतो आणि त्यातली माणसंच जास्त करून महत्त्वाची भूमिका बजावू लागतात. ह्यातली थोडीफार माणसं शहाणी असतात तर बरीचशी शहाणपण आणि वेडेपणाच्या सीमारेषेवरून वाटचाल करताना दिसतात. ही सर्वच माणसे पूर्णत: शहाणीही नसतात म्हणून तर दळवी अशा सर्वांनाच वेडगळ म्हणून संबोधतात.

दिगंबर कामत ह्या गावातलाच एक. एका कंत्राटदाराचा मुलगा. शिवाय जमीनदार म्हणून श्रीमंत. वयानं तरुण आणि म्हणून नीटनेटका राहणारा. पेशानं तो शिक्षक; पण ही शिक्षकीही अशीतशीच. दिगंबर वयानं वाढलेला तरुण. आईनं वेडेपणात आत्महत्या केलेली. पदरात दोन बहिणी. कृष्णी आणि केशर दोघी जाणत्या आणि चांगल्या देखण्या पण. त्या दोघीही वेडसर; पण त्यांच्या आईसारख्या, नागव्यानं विहिरीवर आंघोळ करण्याइतपत. वेड्या नसलेल्या घराण्यातलं वेडेपणाचं भूत सगळ्यांच्याच मानगुटीवर बसलेलं. म्हणून बहिणींची लग्नं अडलेली. ह्याचीही तीच गत. हाही बिनलग्नाचाच जगणारा.

दळवींच्या लेखणीला अशा वेड्या किंवा वेडसर व्यक्तिमत्त्वाचं मुळातच आकर्षण असावं. रुक्मिणीसारखी त्यांची उत्कृष्ट कथा देखील अशा एका वेड्या स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वातून साकार होताना दिसते. अशा वेडसर व्यक्ती, त्यांचे भावनात्मक विश्व, त्यांचे शारीरिक आणि मानसिक संबंध, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातले तणाव-दुरावे दळवी 'वेडगळ'मध्ये देखील साकारताना दिसतात.

दिगंबरची बहीण कृष्णी गावातल्याच सगुण नाइकाशी प्रेम जमवू पाहते आणि दिगंबरचा हा सहकारी शिक्षक प्रेमाच्या आणाभाका घेऊन देखील नंतर घराण्याच्या वेडाचा दाखला देऊन तिचे हे निर्मळ प्रेम नाकारताना दिसतो, तर दिगंबरच्या दुसऱ्या मित्रावर मिठागारात जकातकारकुनाचे काम करणाऱ्या सुभाष साळगावकरावर जीव टाकणारी त्याची धाकटी बहीण केशरपण आपल्या प्रेमात अयशस्वी होताना दिसते. स्वत:च्या भावविश्वात,दु:खात मग्न झालेला सुभाष साळगावकर तिचा स्वीकार करण्यात असमर्थ ठरतो. ह्या दोन्ही घटनांच्या परिणामी एकीकडे कृष्णी वेडसर होऊन जाते तर केशर मूकपणे आपले दु:ख गिळण्याचा प्रयत्न करते. (कृष्णीसारखी किंवा सुभाषसारखी अनेक वेडसर माणसे दळवींनी इथे रंगविलीयत. दिगंबरचा शाळेतला सहकारी जगदीश देसाई त्यातलाच एक. मन लावून वर्गात इंग्रजी शिकविणारा हा शिक्षक एरवी मात्र सदैव ऑथेल्लोसारख्या नाटकाच्याच विश्वात जगत असतो. स्वत:ला आणि दुसऱ्यांनाही अनाकलनीय प्रश्न विचारतो आणि नेहमीच त्यांची उत्तरेही शोधण्यामागे असतो. वयाने वाढलेले सुपरिटेंडेंट आपटे देखील अनेक मुलींना जन्म देऊन ते पुत्रजन्मासाठी उतावीळ झालेले असतात. दिगंबरच्या शाळेतले हे आपटेमास्तर काय किंवा इंग्लंडहून शिकून आलेले त्यांचे अपत्यहीन हेडमास्तर रांगणेकर काय, कृष्णीला नाकारून संसारात पडलेला सगुण नाईक काय किंवा गावातला वयस्कर हवालदार साटम काय, सगळे एका माळेचेच मणी असतात. ते सर्वच शहाणे तितकेच वेडेही असतात. ह्या वेडेपणापोटीच ते गावात कुठून तरी येऊन पोहोचलेल्या अत्यंत सुंदर पण वेड्या मुक्तावर डोळा ठेवून असतात. तिच्यात नको तेवढा रस घेतात. इतकेच काय एकदा ती चौकीपुढे नग्न होऊन उभी राहिल्याचे समजल्यावर तिला पहायला सुसाट धाव घेतात !

दळवींनी ह्या सर्वांच व्यक्तिमत्त्वांच्या प्रकृती आणि विशेषत: विकृती ठळकपणे मांडल्यायत. ह्या विकृतींच्या तुकड्यातुकड्यातूनच ही कादंबरी आकार घेते आणि ह्या विकृती सुद्धा नेहमी शारीरिक पातळीवर येऊन उतरतात आणि म्हणूनच ती दिगंबरच्या दुर्दैवाची कथा असली तरी ती वेड्या मुक्ताभोवती फेर धरताना दिसते. कादंबरीतली ही मुक्ता पोटीशी रहाते आणि अनेकांच्या मनात कुतूहलाबरोबरच अनेक प्रश्नही निर्माण करते. शेवटी दिगंबर आपले लग्न जमविण्याच्या प्रयत्नात अयशस्वी होतो आणि सगुण नाइकाचा वेडा चुलता महेश्वरबुवा आपला बाप असल्याची जाणीव होताच मनाने उध्वस्त होतो.

माणसांच्या मनोविकृतींचे चित्रण करणारी दळवींची ही साहित्यकृती 'वेडगळ' ही एक उत्तम कलाकृती निश्चितच म्हणता येणार नाही. मर्यादित आशयावर घडविलेली ही एक बरी कादंबरी म्हणायला हवी. दळवींच्या सिद्धहस्त लेखणीचा ती थोडाफार प्रत्यय आणून देते; पण एखादे प्रभावी कथानक घडविण्यात अगर व्यक्तिमत्त्व रंगविण्यात आणि म्हणूनच वाचकांच्या मनावर एक उत्कृष्ट ठसा उमटविण्यात ती अयशस्वी ठरते.

—अशोक प्रभाकर डांगे

वेडगळ :
जयवंत दळवी
मॅजेस्टिक बुक स्टॉल
पृष्ठसंख्या : १५३
मूल्य : चौदा रुपये

# संत गोरा कुंभार

## घोर निराशा

१३ व्या १४ व्या शतकांमध्ये महाराष्ट्रात गोरा कुंभार, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, नामदेव इत्यादी प्रसिद्ध कवी आणि संत होऊन गेले. त्या सर्वांत गोरा कुंभार हा वयाने मोठा. हे समकालीन संत त्याला 'गोरा काका' या नावाने हाक मारीत. गोरा कुंभाराच्या आयुष्याबद्दल तशी फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. पंढरपूरपासून ५० मैलांवर असलेल्या तेरढोकी या गावात गोरा कुंभार राहात असे. त्याला वतनी इनाम होते. विठ्ठलाच्या भक्तीमध्ये तो इतका तल्लीन होत असे की, एके दिवशी मडक्यांसाठी माती तुडवीत असताना त्याचे एकुलते एक मूल त्या मातीत तुडवून मारले गेले तरी याची विठ्ठलनामाची समाधी भंग पावली नाही; पण या प्रकारामुळे त्याची बायको 'सन्ती' भयंकर संतापली आणि त्याला वाटेल ते बोलू लागली. विठ्ठलाबद्दल जेव्हा ती वाईट बोलू लागली तेव्हा गोरा चिडला आणि तिला मारायला धावला. सन्तीने 'मला हात लावलात तर विठ्ठलाची शपथ आहे!' असे म्हणताच गोरा थबकला. त्याने बायकोला स्पर्श करायचे सोडले. या विरक्तीमुळे भलतीच पंचाईत आली. गोराचा वंश कसा वाढणार याची चिंता त्याच्या सासऱ्यांना पडली. 'सन्ती'ला हात लावायचा नसेल तर लावू नका; पण तिच्या धाकटया बहिणीशी 'शमी'शी लग्न करा! अशी गळ त्यांनी गोराला घातली. 'दोघी बहिणींना मी सारखेच वागवीन!' असे सांगून गोराने दुसरे लग्न केले; पण वंशवाढ कशी होणार? कारण गोरा दोघींनाही 'समान वागणूक' म्हणजे दोघींनाही स्पर्श करीनासा झाला. एके दिवशी काम करून, दमून-भागून गोरा घरी येतो आणि झोपतो. धाडस करून दोन्ही बायका त्याच्या जवळ जातात आणि त्याचे हात आपल्या अंगावर घेतात. गोरा जागा होतो तेव्हा त्याला आपण काय केले हे कळते आणि प्रतिज्ञा मोडली म्हणून तो स्वतःचे दोन्ही हातांचे पंजे कापतो. पुढे नामदेवाच्या कीर्तनात दंग असताना त्याला परत हात फुटतात, विठ्ठलाच्या कृपेने त्याचे मूलही त्याला परत मिळते.

'सुमधुर अभंग, लावण्या व रोमहर्षक चमत्कारांनी सजलेले' अशी जाहिरात केलेले 'सन्त गोरा कुंभार' हे नाटक रंगभूमीवर आले आहे. अशोक जी. परांजपे हे नवीन नाटककार, दिलीप कोल्हटकर हे प्रायोगिक रंगभूमीवर गाजलेले कलाकार, दिग्दर्शक, नामवंत 'ट्रिकसीनकार' शिरगोपीकर आणि श्रेष्ठ गायक, संगीतकार जितेंद्र अभिषेकी यांनी हे नाटक उभारले आहे.

वर सांगितलेल्या गोराच्या उपलब्ध माहितीमध्ये नाटककार अशोक जी. परांजपे यांनी एक अत्यंत भलतेच उपप्रकरण जोडले आहे. गावातला एक श्रीमंत, वेदसंपन्न-उत्कृष्ट गायक, भाषापंडित, कीर्तनकार आणि त्याचा माजोरी शिष्य दोघे गोराच्या बायकोवर डोळा ठेवून असतात. सन्तीवर लक्ष ठेवून तिचा पिच्छा करण्याचा प्रकार ते अतिशय अश्लाघ्य मार्गांनी करतात. घरात कोणी नाही असे पाहून निरनिराळ्या मार्गांनी घरात घुसणे, तिला हाका मारून शारीरिक जवळीक साधण्याचा प्रयत्न करणे, अंगणातच भजन म्हणत बसणे इत्यादी. गोरा कुंभाराला पुष्कळ कर्ज झाले आहे असेही यात दाखविले आहे. सावकार आणि ग्रामस्थांना फितवून हा कीर्तनकार गोराच्या घरावर जप्ती आणीत असतो. असह्य होऊन 'सन्ती' जळते लाकूड घेऊन कीर्तनकाराच्या अंगावर चालून जाते. त्यामुळे घाबरून कीर्तनकार व शिष्य पळून जातात. (प्रेक्षक खूष) गोराच्या दुसऱ्या लग्नानंतर ही द्वयी तिच्याही (शमीच्या) मागे लागते. शमीचे ज्योतिष सांगण्याच्या निमित्तावरून कीर्तनकार शमीचा हात हातात घेऊन जवळीक करू लागतो. इतक्यात ती सावध होते म्हणून वाचते. एके दिवशी रात्री मात्र शिष्याला राखण करायला लावून कीर्तनकार सन्तीला पकडतोच; पण भक्तांच्या हाकेला धावणारा विठ्ठल कीर्तनकाराला आणि त्याच्या शिष्याला कुंभाराच्या चाकात गरागरा फिरवितो आणि सपाटून मार देऊन हाकलून देतो. (हा ट्रिकसीन बर का)

तीन अंक चालणारे हे नाटक रचनेच्या बाबतीत पसरट झाले आहे. नाटककार अशोक जी. परांजपे यांनी प्रसंगांची क्रमवारी योग्य केली आहे; पण अगदीच साधी सामान्य भाषा आणि संवादाचा तोचतोचपणा यामुळे नाटक कंटाळवाणे होत जाते. गोराचा सासरा लग्नासाठी गोराचे मन वळवितो, दोन्ही बहिणी आपल्या दुःखातून मार्ग काढायचे ठरवितात. नामदेवाचा अहंकार गोरा दाखवितो आणि गोराला हात येतात. हे महत्त्वाचे प्रसंग भाषादृष्टया अजून फुलावयास पाहिजे होते. अभंगांची योजना फारच थोडया ठिकाणी योग्य वाटते. 'तू भजन म्हण. मग मीही म्हणतो' अशा जागा अभंगासाठी तयार केल्या आहेत. (कदाचित संगीताच्या व्यावसायिक किंमतीमुळे केलेली ही तडजोडही असेल; पण ती कंटाळा वाढविते इतकेच.)

आविष्कारामध्ये हे नाटक संपूर्णपणे ढिसाळ झाले आहे. दिग्दर्शक म्हणून दिलीप कोल्हटकर या हुषार, बुद्धिमान माणसाने काही केले आहे हे कुठे जाणवतच नाही. या तरुण माणसाकडून 'संत साधु' इत्यादिकांच्या 'भक्तिपर' नाटकांमध्ये एक नवीन प्रकारचा फ्रेशनेस, गतिमानता येईल अशी अपेक्षा होती. ज्ञानेश्वर, सोपान, नामदेव, निवृत्ती गोराच्या घरी येतात व गोरा नामदेवाला त्याचे खरे स्थान दाखवितो. हा प्रसंग, गोरा दमूनभागून घरी आला आहे व दोन्ही बायका त्याच दिवशी त्याला स्पर्श करणार

आहेत या प्रसंगातील उत्सुकता, गंभीरता, नामदेवांच्या कीर्तनात साथ करीत असताना आपले हात नाहीत त्यामुळे आपल्याला विठ्ठलाच्या गजरात टाळ्या वाजवीत सहभागी होता येणार नाही म्हणून गोराला वाटणारे अपार दुःख आणि त्याच क्षणी त्याला हात फुटल्याने त्याची झालेली दिग्मूढ अवस्था हे महत्त्वाचे प्रसंग संपूर्ण भावनिक आघात देत नाहीत. शिरगोपीकरांचे ट्रिकसीन्स आणि त्याचा कोल्हटकरांनी केलेला उपयोग दोन्ही सामान्य आणि पोरकट आहेत. ( विठ्ठलाची मूर्ती नाहीशी होताना ती विंगेतून हलविणाऱ्याचा हात विंगेतच लावलेल्या ' स्पॉट 'मुळे विंगेच्या कापडामागे चक्क दिसला.)

पण सगळ्यात जास्त अन्याय केला गेला आहे तो गोरा कुंभाराच्या व्यक्तिरेखेवर स्वभावधर्मावर आणि गोराच्या तात्कालिक समाजप्रतिमेवर. साहित्यिक म्हणून गोराचा विचार केला तर आता त्याचे फक्त ४० अभंगच उपलब्ध आहेत. त्यातले सुमारे २० त्याच्या चरित्रपर आहेत. म्हणजे भक्तीचे अभंग फक्त २० च आहेत. पण या अभंगातल्या शब्दगोडीमुळे, ज्ञानामुळे, पराकोटीच्या भक्तिभावामुळे गोरा कुंभार मोठा संत म्हणून ओळखला जातो (उदा. निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे, तव झालो प्रसंगी गुणातीत । किंवा, आनंदी आनंद गिळून रहाणे, अखंडित होणे न होऊनिया । इत्यादि) कुंभार जातीत गोरा आणि राका हे मोठे संत होऊन गेले; पण गोराचे वेगळे मोठेपण म्हणजे निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपानदेव हे संतही गोराचा परम आदर करीत. नामदेवावर तर गोराची मुलासारखी माया होती. गोरांचे बरेचसे अभंग नामाला उद्देशून लिहिले आहेत असेही म्हणतात. गोरा हा गावात वतनी इनाम संभाळून होता. १३ व्या शतकातल्या समाजस्थितीतही गोराचे स्थान काय होते याची थोडीशी कल्पना येऊ शकते; पण नाटकात प्रकाश घांग्रेकरांनी उभा केलेला गोरा हा दुबळा, पाबळा, भाबडा आणि संपूर्ण अनभिज्ञ वाटतो. विठ्ठलभक्तीचा जोष, विठ्ठलाची अनिवार ओढ कुठे दिसतच नाही. याला घांग्रेकरांइतकेच लेखक आणि दिग्दर्शकही जबाबदार आहेत. प्रत्येक प्रसंगात गोरोबाचा वेगळा मोठेपणा दिसण्याऐवजी ' वेगळेपणा ' फक्त दिसतो. स्वतःच्या बायकोच्या मागे वैषयिक दृष्टीने एक कीर्तनकार लागला आहे हे गोराला म्हणे कधी समजतच नाही. संगीत नाटकात नेहमीच दिसणारा प्रकार इथेही आहेच. विठ्ठलाच्या मूर्तीकडे सुरुवातीला पाहून अभंग चालू करायचा आणि थोड्याच वेळात प्रेक्षकांना विठ्ठलमय समजून त्यांच्याकडे पहात मैफल सजवायची. नाटक पहात आहोत का संगीत मैफल ऐकत आहोत हा प्रश्न पडतो. आपला चेहरा चुकूनही हालू नये आणि हातापायांचा उपयोग फक्त ताना मारताना करायचा याची काळजी घांग्रेकरांनी घेतली आहे. घांग्रेकरांनी त्यांचे अभंग अतिशय सुंदर आणि गोड म्हणले आहेत; पण त्याला अभिनयाची जोड नसल्यामुळे त्यांचा गोरा मनातून उतरतच जातो. नारायण बोडस या देखण्या नटाने कीर्तनकार चांगला उभा केलेला आहे; पण लेखनदृष्टचा त्याचे पात्र ' कामविकार ' या एकाच अंगाने चित्रित झाल्यामुळे त्याचे काम बटबटीत वाटत रहाते. त्याने म्हटलेले अभंग दाद घेतात, त्याच्या शिष्याचे काम केलेला विनायक दामले हा नट उठून दिसतो. नारायण बोडस आणि दामले या नाटकात जिवंतपणा आणतात. ( पण त्यांनी ' गूळपाण्यावर ' केलेला विनोद हीन पातळीवरचा आहे. )

अभिनय आणि गाणे या दोनही आघाड्यांवर फैय्याजने बाजी मारली आहे. सन्तीचे ( पहिली बायको ) चित्र ती संपूर्ण साकार करते. नवऱ्याबद्दल सतत वाटणारा आदर, भक्ती आणि नवऱ्याने मूल तुडवून मारले, तो आपल्याला स्पर्शही करीत नाही, सख्खी बहीण आपली सवत झाली. तरीही गोराबद्दलची समर्पणाची भावना फैय्याजने फार चांगल्या प्रकारे आविष्कारित केली आ[है]. मूल परत मिळण्यासाठी ती विठ्ठलाची याच[ना] करते. तेव्हा तिची आर्तता गोरापेक्षा[ही] जास्त प्रखर वाटते. आपले अभंगही ति[ने] छान म्हणले आहेत. या चौघांशिवाय आणख[ी] ७, ८ जणांनीही नाटकात कामे केली आहेत.

पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी दिले[ले] संगीत ही या नाटकातली जमेची बाज[ू]. सर्वच अभंगांना त्यांनी छान सजविले आहे[त]. नाटकाच्या विविध प्रसंगांतील भावना त्यांन[ी] दिलेल्या सुरांतूनच जास्तीत जास्त व्यक्त होतात; पण अभिनयाची जोड त्यांन[ा] मिळाली नसल्याने नाटकातच एकजीव होऊ[न] हे अभंग लक्षात रहात नाहीत.

सन्तांबद्दलच्या भोळ्या भक्तिभावाल[ा] पोरकट आवाहन करण्याखेरीज या नाटकात दुसरे काहीच नाही. गोरोबाचा अधिका[र] एवढा मोठा होता की, नामदेव परमार्था[त] कच्चा का पक्का हे ठरविण्याच्या कामी गोराचा शब्द प्रमाण मानला गेला! गोरोबाने 'अनुभवाचे' थोपाटणे लावून योग्य तो निवाडा दिला. हा गोराचे व्यक्तिमत्त्व दाखविणारा महत्त्वाचा मुद्दा संपूर्ण दुर्लक्षिला गेला आहे. ' ट्रिकसीन्स 'पेक्षा अशा बाजूंनी गोरा साकार होईल अशी अपेक्षा होती.

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात शिक्षणांमुळे, वैज्ञानिक प्रगतीमुळे, नवीन अर्थकारणामुळे समाजजीवन झपाट्याने बदलत आहे. ७०० वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या संतांचा, कवींचा निराळा अर्थ लावता येईल का ? हा प्रश्न अलीकडे बुद्धिमंतांना चालना देतो. संतांनी भक्तिमार्गाशिवाय समाजशिक्षणात, समाजरचनेत काय स्थित्यंतरे घडविली आहेत याचा चिकित्सक अभ्यास चालू आहे. या पार्श्वभूमीवर ' गोरा कुंभारा 'वर रचलेले हे नाटक अतिशय घोर निराशा करते.

जोकर कोसळले
आणि आवई उठली
राजकपूर संपला.
पण जोकरचे कडवट अपयश पचवून
राजकपूरने बरसातची याद देणारे बॉबी दिले.
मरगळलेले आर. के. बॅनर
पुन्हा सरसरून उभे राहिले.

□ □

आता सत्यम् वितरीत झाला.
राजकपूर पुन्हा एकदा धास्तावला.
चित्रनिर्मितीचा हा जुगार
तो वर्षोगणती खेळतोच आहे.
पण नवीन चित्र वितरीत होत असताना
एक विचित्र दडपण त्याच्यावर येते.
दिल्लीला जाण्यापूर्वी दिलेल्या मुलाखतीच्या वेळी
तो या दडपणाखाली होता.

□ □

सत्यम् जोकरच्या वाटेने जाणार का बॉबीच्या
ही चर्चा सारी मुंबई आज करत असतानाच
त्याच्या तीस वर्षांच्या
प्रवाही चित्र कारकीर्दीचा आलेख

# माणूस
# बरसात विशेषांक

सादरकर्ते : शरद गोखले
प्रसिद्धी : लवकरच

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# त्रिशूल

## तीन शूळ–त्रिशूळ, मस्तकशूळ व पोटशूळ

त्रिमूर्ती फिल्म्स, निर्माता गुलशन राय, दिग्दर्शक यश चोप्रा, कथा–पटकथा–संवाद सलीम–जावेद, संगीतकार खय्याम, गीतकार साहिर आणि 'भूमिका' या सदरात अनेक बडी नावे अशी अतिशय बडी बडी नावे असलेल्या आसामींनी आपापल्या नावाप्रमाणे लहानमोठा शूल आपल्या हातात घेऊन प्रेक्षकाला जमेल त्या जागी, जमेल त्या ताकदीने व जमेल तितक्या वेळा भोसकण्याचा केलेला सामुदायिक प्रयत्न म्हणजे त्रिशूल !

राजकुमार गुप्ता (संजीवकुमार) या बड्या कॉंट्रॅक्टरला त्याच्या अनौरस मुलाने– (अमिताभ बच्चन) धडा शिकविणे. त्याच्या चुकीचे प्रायश्चित्त देणे या सगळ्या प्रयत्नांमधून बाप व मुलगा यांच्यातील संघर्ष दाखविण्याचा सलीम–जावेदचा उद्देश असावा. शेवटी नेहमीप्रमाणे गुप्तासाबना विजय आपलाच मुलगा असल्याचे कळून ते स्वतःच्या 'त्या' चुकीबद्दल देहांत प्रायश्चित्त घेऊन टाकतात. नंतर चित्रपटातील बाकी सर्व जण त्यांचे तर्पण उरकून ग्रुप फोटोला हसरे चेहरे द्यायला मोकळे होतात.

बाप व मुलगा यांच्यातील संघर्ष म्हटल्यावर माझ्या डोळ्यांपुढे पार अर्जुन–शिवाजी–रुस्तुमपासून बभ्रुवाहन–सोहराबपर्यन्तच्या सगळ्या जोड्या तरळून गेल्या. बहुधा सलीम–जावेदांच्या डोळ्यांपुढेही या साऱ्या जोड्या फिरून गेल्या असाव्यात. त्या सगळ्यांच्या वेगवेगळ्या गोष्टींची भ्रष्ट नक्कल दोघांनी आपल्या नेहमीच्या विदेशी स्टायलीत उरकली आहे. म्हणजे अर्जुन-उलुपीच्या लफड्यासारखे राज–शांती (संजीवकुमार–वहिदा रेहमान) लफडे आहे. बभ्रुवाहनाला आईकडून मिळालेल्या उपदेशाप्रमाणे विजयलाही शांतीकडून बापाला धडा शिकविण्याचे धडे मिळतात. रुस्तुम–सोहराब लढाईप्रमाणेच सगळ्या लढायांमध्ये राज म्हणजे बाप पोराच्या बाबतीत अज्ञानी तर विजयला म्हणजे पोराला बापाची माहिती. शेवटी फक्त सोहराबच्या मृत्यूऐवजी राजबापाचे बलिदान ! शिवाजी–संभाजीप्रमाणेच शेवटी 'लेकरा, आम्हाला सोडून कोठे गेला होतास रे ?' आणि 'आबासाहेब, आम्ही चुकलो'च्या ऐवजी 'बेटा. मी चुकलो.' आणि 'डॅडी, आम्हाला सोडून नका हो जाऊ'ची तळमळ विनंती. एकूण काय धन्य तो सलीम, धन्य तो जावेद !

आता हिंदी सिनेमा म्हटल्यावर प्रेम, नाचगाणी वगैरे मसाला आलाच. त्यासाठी हेमामालिनी, राखी वगैरे बुजुर्ग आणि पूनम हे नवीनच नाणे (किंमत–दिडकी, कवडी किंवा ढब्बू पैसा) खर्ची घातले आहे. तिघींना अनुक्रमे शशीकपूर, अमिताभ बच्चन व सचिनच्या दिमतीला लावलेले.

एकूण कथेची रचनाच अशी केलेली आहे की, राज हा पहिल्यापासूनच प्रेक्षकाच्या रागाचा, तिरस्काराचा आणि त्यामुळे विजय सहानुभूतीचा बळी ठरलेला. ही रचना अत्यंत जाणीवपूर्वक केल्यासारखी वाटते. कारण प्रत्येक प्रसंगात विजयचा वरचष्मा राहतो आणि ते आवडल्यामुळेच प्रेक्षक शिट्ट्या, टाळ्या मारतात. तर अशी ही कथा सलीम-जावेदनी नेहमीच्या तंत्राने वेगवान पटकथेतून प्रेक्षकांवर सोडली आहे. एका मागोमाग एक घटना प्रेक्षकांवर आदळतात आणि त्याला जणू बधिरच केलें जाते. त्यासाठी त्यांनी मारामाऱ्या, कॉंट्रॅक्ट मिळविण्यातील कारस्थाने, त्यात हरघडी विजयचा वरचढपणा इत्यादी सर्व युक्त्या वापरल्या आहेत. संवादही सलीम-जावेदचेच आहेत. संवादांमध्ये तर काही ठिकाणी असे स्पष्ट जाणवते की, जणू हा संवाद आणण्यासाठीच हा प्रसंग घडवीत आणला आहे. उदाहरणार्थं विजयच्या हाताच्या जखमेचे रक्त राजच्या हाताला लागताना घडलेले संवाद. या संवादांमध्ये सुद्धा भयंकर पक्षपातीपणा. विजयची भूमिका अमिताभ करणार, विजयला सहानुभूती मिळवून द्यायची आणि अमिताभ त्याच्या खर्ज आवाजात, दातावर दात आवळून गंभीर स्टायलीत, डोळे तांबडे करीत संवाद बोलणार की, शिट्ट्या या सगळ्या गोष्टी नजरेसमोर ठेवून संवाद पाडलेले. या सगळ्या लफड्यामध्ये आणि 'ज्याने पंचवीस वर्षे स्वतःची आई झिजून मरताना पाहिली, त्याला कसली आलीय मरणाची भीती ?' असले ठेवणीतील संवाद अमिताभच्याच वाट्याला देण्याच्या व्यवस्थेमध्ये त्या पात्राला न्याय मिळणे बाजूलाच इतर पात्रांवर मात्र अन्याय झाला. शिवाय एका बाजूला एका पात्राच्याच वाट्याला असे चमकदार संवाद आल्यानंतर ते पात्र पडद्यावर नसताना इतरांना इतके मिळमिळीत, पातळ आणि अळणी संवाद बोलावे लागलेत की बस ! उदाहरणार्थ– बबली (पूनम)ने मागविलेली अभ्यासाची पुस्तके घेऊन रवी (सचिन) तिच्याकडे जातो. गेल्यावर रवी (गंभीरपणे)–मला माहीत नव्हतं, तू इतकी बदलशील. बबली (चमकून, काळजीच्या सुरात)–म्हणजे ? तुला काय म्हणायचंय ? सचिन (एकदम हसून)–नाही, पुस्तकं वाचण्याची अन् अभ्यासाची सवय केव्हा लागली बाईसाहेबांना ?

यातील कंसातील सूचना माझ्या कल्पनेतील आहेत. प्रत्यक्षात ती दोघेजण सर्व संवाद अत्यंत एका सुरात आणि चेहऱ्यावर सतत एक थंडपणाचा मुखवटा घालून म्हणतात.

दुसरे एक असेच उदाहरण.

शेखर (शशीकपूर) शीतलला (हेमामालिनी) लग्नाबद्दल विचारतो, तेव्हा शीतल (नाटकी गंभीरपणे)–तू मला लग्नाचे विचारल्यावर मी ताबडतोब होकार देईन, असा तुझा समज असेल, तर (एक प्रदीर्घ शांतता. मग एकदम हसून) तुझा तो समज बरोबर आहे !

बाकीच्या पात्रांबाबत असला फालतू विनोदीपणा आणि नीरसपणा का ? त्यांना

बरे संवाद दिल्यास ती पात्रे सलीम-जावेदवर नाराज झाली असती का ?

कथा, पटकथा व संवाद यांमधून प्रेक्षकांचे मन, डोळे व कान छानपैकी भोसकण्याच्या या कामात कलाकारांनीही मनापासून साथ दिली आहे. सचिन व पूनम दोघांच्या प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या भावहीन चेहऱ्यांबद्दल आणि एकसुरी, खिन्न, संवादबोलीबद्दल वर लिहिले आहेच. शशीकपूरचे उड्या मारून, टाळ्या वाजवून आणि उंच पट्टयात ओरडत बोलून उमदेपण, तरुणपण टिकविणे आता त्याच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावरील तलनपणाइतकेच दिखाऊ आणि तकलादू बनले आहे. भेटणाऱ्या प्रत्येक पोरीवर लाइन मारण्यासाठी सुरू होणारे 'हमारे खयालात कितने मिलते हैं!' हे त्याचे पालुपद तर 'अरे लाइन देते; पण हे रडगाणे नको!' इतके नको-नकोसे. गोरेपणाचा प्रचंड मेकअप करून, ओठाला कुंकवासारखे तांबडेजर्द लिपस्टिक लावून 'अजून यौवनात मी' दाखविण्याचा राखीचा प्रयत्न स्तुत्य; त्यामुळे ती अगदीच सत्तरीची न वाटता पन्नाशीची प्रौढ कुमारिका वाटते. ठीक आहे, तिच्या दृष्टीने कदाचित 'हेही नसे थोडके.' प्रेम चोप्रा या विनोदी खलनायकाबद्दल काय अधिक लिहिणार ? सगळेच उणे लिहिण्यासारखे. वहिदा रेहमानबद्दल असलेल्या आधीच्या आदरामुळे आणि मऊ कोपऱ्यामुळे तिचा उल्लेख टाळतो.

राहता राहिले हेमामालिनी, संजीवकुमार आणि अमिताभ. पैकी हेमामालिनीला फक्त छान छान दिसण्याचेच काम होते, ते तिने विनासायास केले आहे. बाकीच्या चित्रपटापेक्षा तिचे पडद्यावरील दर्शन फारच नेत्रसुखद. अमिताभला डोळ्यांसमोर ठेवूनच त्याची व्यक्तिरेखा रंगविल्याने त्यालाही नेहमीचा संतप्त, धगधगता तरुण उभा करायला फारसा त्रास पडलेला नाही.

सगळ्या चित्रपटात सर्वांत जास्त निराशा कोणी केली असेल तर संजीवकुमारने. हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या संयमित, मातबर अभिनयाने 'एकमेव अभिनेता' असा लौकिक मिळविणारा आणि आपल्या कित्येक कामांमधून तो सार्थ करणारा संजीवकुमार म्हणजे चित्रपटाचा एक आधारस्तंभच. त्यानुन चित्रपटातील एक महत्त्वाची भूमिका त्याच्या वाट्याला आलेली. (खरे तर, पाच-सहा मिनिटांच्या भूमिकेतसुद्धा आपल्या अफलातून दर्शनाने हा गृहस्थ आख्खा चित्रपट खाऊन टाकतो. आणि भल्याभल्यांची छुट्टी करतो.) आपण लाथाडलेल्या प्रेयसीचे व आपल्या मुलाचे शल्य उरात बाळगणारा, ते खुपते शल्य जणू लपविण्यासाठी वा अधिक खोल गाडण्यासाठी सतत संपत्ती अन् प्रतिष्ठेमागे धावणारा, विजयने धंद्यात केलेल्या स्पर्धेने आधी अस्वस्थ बनलेला, नंतर प्रचंड संतापलेला आणि शेवटी पिसाळलेला अन् पिसाटलेला, विजय आपलाच मुलगा आहे हे कळल्यानंतर अगतिक बनलेला, विजयच्या दातृत्वाने आणि आपल्या चुकीच्या जाणिवेने ओशाळलेला, दबलेला आणि शेवटी प्रायश्चित्त घेण्याच्या, विजयला वाचविण्याच्या निश्चयाने पेटलेला राजकुमार गुप्ता–अशी ही बहुरंगी व्यक्तिरेखा उभी करण्यासाठी संजीवकुमारशिवाय दुसरा कोणता योग्य कलाकार मिळणार ? पण हे सगळे पैलू पार अंधारात ठेवून संजीवकुमाराने एक घमेंडी, हेकेखार, रागीट असा राजकुमार गुप्ता उभा करून मूळ व्यक्तिरेखेला आडवे केले आहे. संपूर्ण चित्रपटभर तो आरडाओरडा करतो, भुवया उंचावून, कपाळाला आठ्या पाडून आणि बुबुळे गरागरा फिरवून चेहरा वेडावाकडा करीत राहतो. संपूर्ण कामामध्ये मेलोड्रामाचा वापर करून आणि ती व्यक्तिरेखा 'ओव्हर–प्ले' करून त्याने चित्रपटाचाही विचका केला आहे. खरे म्हणजे ही व्यक्तिरेखा नवीन नसून त्याच्या कित्येक जुन्या कामांचे मिश्रण होते; पण ते त्याच स्वरूपात पुन्हा पेश करणे त्याला साधले नाही. उदाहरणार्थ-त्याच्या मेकअपपासून कित्येक बाबतीत 'शोले' डोकावतो; पण 'शोले'चा संयमित अभिनय त्याने केला नाही. 'मौसम'मध्ये पत्नीच्या मृत्यूची बातमी ऐकल्यावर फुटणाऱ्या संजीवचे रडणे अक्षरशः काळजात चरत जाते. एका समर्थ पुरुषाचा तो आक्रोश माणसाला अस्वस्थ करतो; पण 'त्रिशूल'मधील त्याचे हुंदके देणे विनोदीपणामुळे असह्य होते. जिथे जिथे त्याने जाणीवपूर्वक संयम बाळगला आहे, तिथे तिथे तो वरचढ ठरतोच; पण अशा जागा संपूर्ण चित्रपटात अक्षरशः हाताच्या बोटांवर मोजण्या इतक्या. एरव्ही आवाज फाडून केलेला त्याचा ओरडा कानांचे पडदे फाडीत असतो. या सगळ्याबद्दल मी संजीवकुमारलाच संपूर्णतया दोषी धरीत नाही; कारण 'कहीं दिन कहीं रात'मधील काही भूमिका वगळता असे ओव्हर-ॲक्टिंग वा अतिनाट्य वा कृत्रिमपणा त्याच्या भूमिकेत सहसा असत नाही. एक म्हणजे मघाशी सांगितल्याप्रमाणे कथेमध्येच राजकुमार गुप्ता हा प्रथमपासून प्रेक्षकांच्या रोषाला बळी पडेल असा चितारलेला; पण संपूर्ण खलनायकही नसल्याने प्रत्येक ठिकाणी विजयकडून मार खाणारा. साहजजिकच त्याच्यात एका सफल कॉंट्रॅक्टरची धूर्तता, धंद्यातील जाण न दाखविता पडेल पहिलवानगिरीच दाखविलेली. बरे, त्याला पाडणाऱ्या प्रतिस्पर्ध्याचा–विजयचा गुण म्हणजे आत्मविश्वास आणि अंधारात उडी घेण्याचे धाडस. मुळात कथेतच अशी अर्धी–कच्ची, लोंबती, मुळे नसलेली व्यक्तिरेखा, त्यात संजीवकुमारने दिलेला असला आविष्कार. यात दिग्दर्शकाच्या सूचना असणारच. म्हणूनच मी संजीवकुमारला संपूर्णतया दोषी धरीत नाही. एक वेगळा प्रयोग म्हणून जर स्वतः त्यानेच ही भूमिका अशी रंगविली असेल; तर बोलणेच खुंटले. संजीवकुमारला प्रेक्षकांना भोसकण्यासाठी सर्वांत मोठा शूल मिळाला आहे.


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

दिग्दर्शक यश चोप्रांनी संपूर्ण चित्रपटभर अवास्तव स्वप्नरंजनाला वास्तवतेचा मुलामा चढविला आहे. लहानपणापासून मजुरी करणारा विजय एकदम इंजिनिअरिंगमध्ये तरबेज कसा होतो?–पासून ते हिंदी चित्रपटात सर्वच जण ज्यूडो, बॉक्सिंग इत्यादी जीव देण्या-घेण्याच्या प्रकारांमध्ये एवढे निष्णात कसे असतात?–पर्यंतच्या सर्व प्रश्नांची उत्तरे त्यामुळे मिळून जातात. सुरुवातीपासून 'R. K. Gupta and Sons Constructions' असे बोर्ड पाडून 'Shanti Constructions' असे बोर्ड लावणे आणि सर्वांत शेवटी 'Shanti Raj Constructions'ने ही साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण करणे असले ढोबळ तपशील त्यांनी भरलेले.

साहिर–एक कवी व साहिर–एक चित्रपटगीतकार ही दोन वेगवेगळी व्यक्तिमत्त्वे असल्याचे अलीकडच्या त्याच्या गीतांवरून ध्यानात येते. पूर्वी तो असा दुहेरी व्यक्तिमत्त्वाचा शिकार बनला नव्हता. तर-चित्रपटगीतकार म्हणून त्याची पंगत इतरांपेक्षा निराळी अजिबात नाही. गापुची गापुची गम गम म्हणजे You are very very sweet आणि किशिकी किशिकी कम कम म्हणजे I love you very very much असे नवे शब्द टांकसाळीतून पाडल्याचे श्रेय त्याच्या किंवा सलीमजी–जावेदजींच्या पदरी जमा आहे. थोडक्यात तिघेही केवळ धन्य आहेत. (मान्य – मान मिळविणारे, धन्य – धन मिळविणारे.)

खय्यामलाही 'शंकर हुसेन'सारखेसुद्धा सूर पुन्हा गवसू नयेत ना?

असा हा 'त्रिशूल' पाहिल्यानंतर त्याच्यामुळे आलेले बधिरपण संपल्यावर पोटशूळ, मस्तकशूळ अशा इतर बऱ्याच शूळांची प्रेक्षकाला आठवण व जाणीव होते.

※

# डॉन

## प्रेक्षकाला लावलेली एक मोठी शेंडी

एक लहान मुलांसाठी कविता आहे. तिचा अर्थ असा–

जगातील सगळे समुद्र एकत्र केल्यावर केवढा मोठा समुद्र होईल? जगातील सगळी झाडे एकत्र केल्यावर केवढे मोठे झाड होईल? जगातील सगळ्या कुऱ्हाडी एकत्र केल्यावर केवढी मोठी कुऱ्हाड होईल? जगातील सगळी माणसे एकत्र केल्यावर केवढा मोठा माणूस होईल? मग त्या एवढ्या मोठ्या माणसाने एवढ्या मोठ्या कुऱ्हाडीने एवढे मोठे झाड तोडून एवढ्या मोठ्या समुद्रात टाकले, तर केवढा मोठा आवाज होईल?

अबबबबब...!

याच चालीवर –

भारतातील सगळे निर्माते एकत्र केल्यावर केवढा मोठा निर्माता होईल? सगळे चित्रपट एकत्र केल्यावर केवढा मोठा चित्रपट होईल? सगळे प्रेक्षक एकत्र केल्यावर केवढा मोठा प्रेक्षक होईल? सगळ्या शेंड्या एकत्र केल्यावर केवढी मोठी शेंडी होईल? मग त्या एवढ्या मोठ्या निर्मात्याने एवढा मोठा चित्रपट एवढ्या मोठ्या प्रेक्षकाला दाखवून त्याला एवढी मोठी शेंडी लावली, तर ती त्या प्रेक्षकाची केवढी मोठी फसवणूक होईल?

अबबबब... !!!! ...

ही फसवणूक केवढी मोठी असेल, याचे मूर्तिमंत प्रत्यंतर म्हणजे 'डॉन.' हा चित्रपट म्हणजे प्रेक्षकाला लावण्यासाठी तयार केलेल्या अनेक शेंड्यांचा एक भला मोठा गुच्छच!

पहिली शेंडी – सलीम–जावेदची कथा. म्हणजे त्यांनी केले काय की, 'धागा धागा खंड विणू या'च्या चालीवर चित्रपटाच्या एकेकाला त्याची त्याची फर्माईश विचारली. अमिताभ, तुला काय बनारसी बाबू व्हायचंय? मंजूर. झीनीबेबी, तुला ज्यूडो, कराटे खेळायचेत? त्यात काय कठीण? दिग्दर्शकसाहेब, तुम्हाला फास्ट टेंपो पाहिजे? ठीक आहे, पटकथा तशी लिहून देऊ. प्राणबाबा, तुम्हाला काय? सर्कशीत कसरत करायचीय का? लंगड्या पायांनी? वा वा! अहो, करून टाका संधी आहे तोपर्यंत. असे 'राखावी बहुतांचि अंतरे' करून त्यांनी या सर्व फर्माइशसमावेशक कथा तयार केली. तिला नाव दिले–डॉन.

मग या भरघोसदार शेंडीत प्रत्येकाने आपापली भर टाकली. अमिताभचे नाच, मारामाऱ्या वगैरे, झीनत अमानचे ज्युडोच्या नावाखाली शरीरप्रदर्शन, फॅशन परेड वगैरे, ओम् शिवपुरीची कारस्थाने, खलनायकी वगैरे–असे बरेच बरेच त्यात आले. एकूण चित्रपट पाहिल्यावर एक–दोन गोष्टी ध्यानात आल्या, त्या अशा–ज्युडो–कराटे वगैरे प्रकार सहा महिन्यांत शिकण्याइतके सोपे असावेत. कोणालाही सहा महिन्यांच्या ट्रेनिंगनंतर जमिनीला पाय न लावता पळणे, हवेत सूर मारून दहा–बारा जणांच्या डोक्यांवरून डायरी पळविणे, दहा–बारा हॉकी स्टिकधारी, सायकलचेनपाणि गुंडांना छान पिटणे व या पिटाईत स्वतःला तोशीस लागू न देणे अशा गोष्टी लीलया व सहज जाता जाता करता येतात. जर मेल्यानंतर आपल्याला 'थडगे' हे हक्काचे घर हवे असेल, तर ते आधी दुसऱ्यासाठी म्हणून तयार करावे, मग ते आपोआप आपल्याला मिळते.

निर्देशक चंद्रा बारोट यांची कामगिरी विशेष लक्षात राहण्यासारखी दर पाच मिनिटांनी 'चित्रपट संपला' असे प्रेक्षकाला भासवत ठेवून, त्याला बेसावध बनवून आणि शेवटी अचानक चित्रपट खरोखर संपवून त्यांनी गोड धक्का दिला आहे. या धक्का-प्रकरणात चित्रपटाची लांबी आवश्यकतेपेक्षा जास्त वाढली (आवश्यकता ०·० मीटर, वर्तमान लांबी–१७ रिळे) त्याला चंद्राजींचा नाइलाज होता.

संगीतकार कल्याणजी आनंदजी यांनी सर्व गीतांमध्ये एकसारखा बँड वाजवून त्या मोठ्या शेंडीत मोलाची भर टाकली.

या चित्रपटाचे निर्माते नरीमन इराणी हे नुकतेच स्वर्गवासी झाले. त्यांच्या गळ्याभोवती या मोठ्या शेंडीचे वळ होते, म्हणतात. □